CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि.१२ फेब्रुवारी २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : १३५ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्याच कसोटीत भारताचा एकतर्फी विजय



✔ **नागपूर :** ऑस्ट्रेलियाविरुद्ध नागपूर कसोटी सामन्यात एक डाव आणि १३२ धावांनी जिंकून भारतीय संघाने जागतिक कसोटी चॅम्पियनशिप अर्थात वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३ च्या गुणतालिकेत आपलं स्थान आणखी मजबूत केलं आहे. या गुणतालिकेत ऑस्ट्रेलियन संघ ७०.८३ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे, तर भारतीय संघाला आता ६१.६६ गुणांची टक्केवारी मिळाली आहे. या विजयासह, भारतीय संघाने आता ओव्हल येथे खेळल्या जाणाऱ्या या WTC फायनलच्या सामन्यात आपलं स्थान निश्चित करण्याच्या दिशेने आणखी एक यशस्वी पाऊल टाकलं आहे. जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या यंदाच्या आवृत्तीच्या अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी भारतीय संघाला ही मालिका किमान ३-१ अशा फरकाने जिंकावी लागेल. यासह, भारतीय संघाची विजयी टक्केवारी ६१.९२ पर्यंत पोहोचू शकते. ज्यामुळे मार्च महिन्यात न्यूझीलंडविरुद्ध श्रीलंका या २ सामन्यांची कसोटी मालिकेवर भारताला अवलंबून राहावे लागणार नाही. दुसरीकडे, भारतीय संघाने आता ही मालिका ३-० किंवा ४-० ने जिंकली तर जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत भारत पहिल्या स्थानी पोहचेल. भारतानं आजचा हा सामना १ डाव आणि १३२ धावांच्या फरकानं जिंकत मालिकेत १-० ची आघाडी घेतली आहे. सामन्यात सुरुवातीपासून भारतानं आपलं वर्चस्व प्रस्थापित केलं होतं. ज्यात ऑस्ट्रेलियाला १७७ धावांत सर्वबाद करुन भारतानं पहिल्या डावात ४०० धावा करत २२३ धावांची आघाडी घेतली. ज्यानंतर ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव केवळ ९१ धावांत आटोपत सामना १ डाव आणि १३२ धावांनी जिंकला आहे.

# अभयारण्याला माळढोकचे पुनर्वैभव लाभणार

## ▪पन्नास एकर जागेवर प्रजनन केंद्र उभारणार

अलीकडेच माळढोकसाठी राजस्थानमध्ये जैसलमेर येथे पहिला 'संवर्धनात्मक प्रजनन प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. देशातील दुसरा प्रकल्प आता सोलापूरमध्ये सुरू होत आहे.

✔ सुराज्य/सोलापूर

**पक्षीमित्रांच्या मनावर अधीराज्य गाजवणाऱ्या पण नामेशष होण्याच्या मार्गावर असलेल्या माळढोक पक्ष्याला वाचविण्यासाठी पुणे वन विभागाने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या पक्ष्याच्या संवर्धनासाठी राज्यातील पहिले 'माळढोक संवर्धनात्मक प्रजनन केंद्र' सुरू करण्यात येणार आहे.विशेष म्हणजे माळढोकचे माहेरघर असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील नान्नज अभयारण्यातील पन्नास एकर जागा निश्चित करण्यात आली आहे. या संदर्भातील प्रस्तावाचे काम सुरू असून, लवकरच तो केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल; तसेच राजस्थान सरकारकडे माळढोक पक्ष्याची अंडी आणि एक नर-मादीची जोडी द्यावी, अशी मागणी करण्यात येणार आहे.**

नान्नज अभयारण्य खास माळढोक पक्ष्यांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. मात्र, गेल्या पंधरा वर्षांत माळढोकची संख्या झपाट्याने कमी होऊन सध्या तेथे केवळ एकच पक्षी वास्तव्यास आहे.

माळढोकचे अस्तित्व असलेल्या सर्वच राज्यांमध्ये ही परिस्थिती असून, यावर पक्ष्याचे अस्तित्व राखण्यासाठी केंद्रीय वन्यजीव संवर्धन संस्थेने 'संवर्धनात्मक प्रजनन प्रकल्पा'चा पर्याय दिला आहे. या पूर्वी गिधाडांच्या संवर्धनांसाठी केंद्रीय वन, पर्यावरण आणि हवामानबदल मंत्रालयाने हा मार्ग स्वीकारला होता.




**राज्यातील पहिलाच प्रकल्प :** या संदर्भात पुणे वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तुषार चव्हाण म्हणाले, 'नान्नज माळढोक अभयारण्याचा समावेश पुणे वन विभागाच्या कार्यक्षेत्रात होतो. काही दिवसांपूर्वीच आम्ही जागेची पाहणी केली आहे. प्रकल्पासाठी ५० एकर जागा निश्चित केली आहे. प्रकल्पासाठी मोठे क्षेत्र आवश्यक असते. यामध्ये वैद्यकीय, संशोधन देखरेखीखालील क्षेत्र आणि पक्ष्याला मुक्तपणे वावरता येईल असा नैसर्गिक; पण बंदिस्त अधिवास राखीव ठेवला जातो. संशोधन विभागात इनक्युटेबर, हॅचर, पिल्लांच्या संगोपनासाठी वेगवेगळे कक्ष असतात. यात पशुवैद्यकीय तज्ज्ञांचे पथक पूर्णवेळ कार्यरत असते.' 'सध्या जैसलमेर येथे याच प्रकारचा प्रकल्प कार्यरत असून, याच धर्तीवर राज्यातील पहिला प्रकल्प लवकरच साकारणार आहे. प्रस्तावाचे काम सुरू असून, राज्य सरकारतर्फे तो केंद्रीय मंत्रालयाकडे पाठविण्यात येईल. राजस्थान सरकारने प्रकल्पासाठी माळढोक पक्ष्याची अंडी आणि एक जोडी द्यावी अशी मागणीही करणार आहोत,' असेही चव्हाण यांनी सांगितले.

### २०१२ मध्ये मांडली होती संकल्पना

राज्यात माळढोक संवर्धनाची संकल्पना २०१२मध्ये मांडण्यात आली. राज्य वन्यजीव मंडळाने २०१४मध्ये या प्रस्तावाला हिरवा कंदील दाखवला होता. एवढेच नव्हे, तर राज्य सरकारने प्रकल्प उभारणीसाठी निधीही जाहीर केला. मात्र, पुढे काहीच घडले नाही. आता राज्यात एकच पक्षी राहिल्याने पुन्हा एकदा वन विभागाने प्रकल्पासाठी कंबर कसली आहे. बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या सहभागातून नान्नजमध्येच प्रजनन केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

### राज्यात एकच माळढोक

वीज वाहिन्यांचा शॉक लागल्याने, शिकारी, आधुनिक शेतीची प्रक्रिया, कीटकनाशकांचा वाढता वापर, संरक्षित क्षेत्रातील मानवाच्या हस्तक्षेपामुळे अनेक पक्ष्यांची संख्या गेल्या तीन दशकांत घटली आहे. नवीन बदल आत्मसात करण्यास अपयशी ठरलेल्या पक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आले असून, काही राज्यांतून हे पक्षी नामशेष झाले आहेत. माळढोक याच पक्ष्यांमधील एक असून, राज्यात सध्या एकच पक्षी राहिला आहे.

### अस्तित्त्वाची लढाई...

आंतरराष्ट्रीय पातळीवर माळढोकचा समावेश लाल यादीत-भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियमानुसार माळढोक संकटग्रस्त-देशातील माळढोकची संख्या केवळ सव्वाशे ते दीडशे -राजस्थान, गुजरात, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटकमध्ये वावर -माळढोक हा राजस्थानचा राज्यपक्षी -सर्वाधिक सव्वाशे माढळोक एकट्या राजस्थानमध्ये-महाराष्ट्रात सध्या एकच माळढोक वास्तव्यास-मध्य प्रदेशात या पक्ष्याचे अस्तित्व नामशेष

# काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचे अखेर हातात हात

### दोन्ही पक्षाकडून वाद टाळण्याचे आवाहन

**काँग्रेस कार्यकर्त्यांनी, राष्ट्रवादी पक्ष व आ.रोहित पवार यांच्याविषयी काहीही बोलू नये. या वादावर पड़दा पडला आहे. यापुढे काँग्रेस, राष्ट्रवादी आणि महाविकास आघाडीच्या वतीने महागाई, बेरोजगारी वाढविणाऱ्या भाजपा विरोधात मिळून लढू, असे काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी म्हटले आहे.**

✔ **सोलापूर :** सोलापूर लोकसभा मतदारसंघावरून काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पेटलेल्या वादावर आ.रोहित पवार यांच्या पोस्टनंतर दोन्ही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून शनिवारी पडदा टाकण्यात आला.

काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन भाजपबरोबर एकदिलाने लढण्याचा निर्धारही केला. काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनीही पदाधिकाऱ्यांना वाद टाळावा, असे आवाहन केले आहे. सोलापूर लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला मिळावा, अशी कार्यकर्त्यांची भावना असल्याचे आमदार रोहित पवार यांनी सांगितले होते. त्याला उत्तर म्हणून काँग्रेसकडून आम्ही सोलापूर



राष्ट्रवादीला सोडला, तर बारामती आणि कर्जत जामखेड काँग्रेसला देणार का, असा सवाल केला होता. तसेच, आमदार प्रणिती शिंदे यांनी तर कोण रोहित पवार, असा प्रश्न करत असे खडे बोल सुनावले होते. त्यानंतर सोलापुरात काँग्रेस-राष्ट्रवादीत संघर्ष पेटला होता. वाद नाहक वाढत असल्याचे पाहून आमदार रोहित पवार यांनीच पुढाकार घेत आमदार प्रणिती शिंदे या आपल्या मोठ्या भगिनी आहेत. त्यांना मला बोलण्याचा अधिकार आहे, त्यामुळे कार्यकर्त्यांनी आपापसात भांडू नये, असे आवाहन केले होते. त्यानंतर दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांनी एकत्र येत वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.



शिवजयंती मध्यवर्ती मंडळाची छत्रपती शिवरायांची १४ फुटी मूर्तीचे सोलापुरात आगमन झाले आहे. सोलापुरात मूर्ती क्रेनच्या सहाय्याने उतरवण्यात आली.

## वळसंग येथे अंगावर गाडी घालून खुनाचा प्रयत्न

✔ **सोलापूर :** पूर्वीच्या भांडणावरून अंगावर गाडी घालून तसेच गळा दाबून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथील श्रीशैल लॉजजवळ बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. निखिल नीलकंठ बिराजदार (वय २६ रा. कुंभारी) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.

त्याने दिलेल्या फिर्यादीवरून वळसंगच्या पोलिसांनी श्रीनिवास गायकवाड आणि राहुल गेजगे (दोघे रा.सेटलमेंट सोलापूर) या दोघांवर खुनाचा प्रयत्न आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला. निखिल बिराजदार हा बुधवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास वळसंग येथील श्रीशैल लॉज जवळ मित्रांसोबत थांबला होता. त्यावेळी दोघांनी त्यांचे त्याच्या अंगावर वाहन घातले. त्यानंतर त्याचा गळा दाबून मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली आहे.

# महाआघाडीतील दुफळीचा फायदा घ्या

### मंत्री उदय सामंत यांनी पदाधिकाऱ्यांना दिला कानमंत्र

✔ सुराज्य/सोलापूर

राज्यात काँग्रेसमध्ये जिल्ह्यात राष्ट्रवादी व काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद उफाळून आले आहे. महाआघाडीतील नेते एकमेकांवर कुरघोडी, पोरकटपणा करून हिणवत आहेत. तीन पक्षांमध्ये मोठी दुफळी माजली आहे. हे सर्व आरोप प्रत्यारोप करण्यात मश्गूल आहेत. सोलापूर लोकसभा मतदार संघाबाबत वाद समोर आला आहे. या दुफळीचा फायदा घेत बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य मतदारांच्या अडचणी सोडवाव्यात. सर्वांनी एकजुटीने विकासकामांवर लक्ष केल्यास त्या' शिवसेनेच्या १४ जागा फक्त चार होतील अन् आपल्या ४४ च्या ८८ होतील, असा कानमंत्र बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे नेते तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी दिला.

माढा तालुक्यातील वाकाव येथे आयोजित राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनासाठी निमित्ताने सामंत हे सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. सायंकाळी त्यांनी सोलापूरच्या शासकीय विश्रामगृह येथे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक घेतली आणि मार्गदर्शन केले.

सर्वसामान्यांना केंद्रित ठेवून विकासकामे मार्गी लावण्यावर सर्वांनी लक्ष केंद्रित करावे. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा घेऊन आपला पक्ष काम करतोय. आपलीच शिवसेना खरी बाळासाहेबांची आहे. आपल्या कार्यकर्त्यांनी भाजपच्या मदतीने सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे. सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव सोबत असल्याची अभिवचन सामंत यांनी दिले. या बैठकीत जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, मनिष काजळे, शहरप्रमुख मनोज शेजवाल, उपजिल्हाप्रमुख तुकाराम मस्के व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**माझी चौकशी करायची असेल तर खुशाल करा**

कोकणातील एका पत्रकाराच्या संशयास्पद अपघाताची चौकशीही झालीच पाहिजे, या घटनेचा सर्वात प्रथम निषेध मी केला. आंबेकर या व्यक्तीस कडक कारवाई ही झालीच पाहिजे. माझ्यासोबत कित्येक जण फोटो काढत असतात माझ्या फोटोचा गैर अर्थ लावत आहेत. खासदार संजय राऊत यांनी मी दोषी असल्याचा कोणताही उल्लेख केला नाही. मी कुणाचेही समर्थन करत नाही. घाणेरडे राजकारण करण्याच्या वाटेला मी जात नाही. माझ्याकडेही अनेक मंत्र्यांचे फोटो असल्याचे सामंत यांनी यावेळी सांगितले. माझी चौकशी करायची असेल तर खुशाल करा, माझ्या नावावर अथवा नातेवाईकांच्या नावावर एक इंच जागा असेल तर राजकारण सोडेण्याचे आव्हान आरोप करणाऱ्यांना सामंत यांनी दिले.

**मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच होईल :** राज्य मंत्रीमंडळाचा विस्तार लवकरच होईल, योग्य वेळी होईल, असे सांगत त्यांनी मंत्रीमंडळ विस्ताराबाबत मंत्री सामंत यांनी सविस्तर बोलणे टाळले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तू मला काय गिफ्ट आणशील ते पाहू !!

कल्याण
270-92-589

# कुंभारी एमआयडीसीचे भूसंपादन लवकरच : उदय सामंत

### ▶ सोलापुरात एमआयडीच्या प्रादेशिक कार्यालयाची घोषणा

✔ **सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातून रस्ते विकासाचे मोठे जाळे निर्माण झाले आहे. निर्माण झालेल्या हायवेमुळे जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे. सोलापूर जिल्ह्यात चांगले उद्योग येण्यासाठी कुंभारी, अक्कलकोट, पंढरपूर, मोडनिंब , चिंचोळी नव्याने एमआयडीसी निर्माण केल्या जाणार आहेत. कुंभारी औद्योगिक क्षेत्राची हायपॉवर कमिटी तयार झाली आहे. लवकरच ९४६ हेक्टर जागेचे भूसंपादनाची प्रक्रिया चालू केली जाणार आहे. मंद्रुपच्या शेतकऱ्यांचा एमआयडीसीला विरोध असेल तर शेतकऱ्यांवर जबरदस्ती केली जाणार नाही. त्यांच्या जमीन लवकरच परत करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उद्योग विभागाचा आढावा आणि शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.त्यानंतर पत्रकारांची संवाद साधताना सामंत म्हणाले, जिल्ह्यातील सुरत चेन्नई इंडस्ट्रियल कॉरिडोर, नागपूर गोवा हायवे, हैदराबाद सुरत, पुणे - मुंबई हे हायवे सोलापुरातून जात आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये एमआयडीसीमधील जागा कमी पडतील. त्यामुळे काही नव्याने तर काही एमआयडीचा विस्तार केला जाणार आहे. कुंभारी एमआयडीचे ९४६ हेक्टर वर आहे. हाय पॉवर कमिटी गठित झाली आहे. दर फायनल झाला आहे. लवकरच भूसंपादनाची कार्यवाही चालू केली जाणार असल्याचे सामंत यांनी सांगितले. अक्कलकोटमध्ये १०० तर पंढरपुरात १५१ हेक्टरवर एमआयडीसी होणार आहे. जागा निश्चितीसाठी १५ फेब्रुवारीला भू-निवड समिती अक्कलकोट आणि पंढरपुरात येणार असल्याचे सांगितले. सोलापूर चिंचोळी औद्योगिक वसाहतीमध्ये जागा शिल्लक नसल्याने या एमआयडीचा विस्तार करण्यासाठी १५१ हेक्टर जागा भू-संपादन केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. मोडनिंब येथे देखील ३२२ हेक्टर औद्योगिक वसाहत निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. सोलापुरात एमआयडीसीचे कार्यालय चालू करून एक खिडकी योजने अंतर्गत सर्व सुविधा दिल्या जातील.



यासाठी लागणाऱ्या इमारतीसाठी ४ कोटी ५१ लाखांच्या निधीची घोषणा केली. आठ दिवसात त्याचा आदेश काढला जाणार असल्याचे सांगितले.

**▶ मंद्रुपच्या जागा शेतकऱ्यांना परत करणार**

दक्षिण सोलापुरातील मंद्रुप येथील शेतकऱ्यांचा एमआयडीसीसाठी संपादित केलेल्या जागेला विरोध आहे. एकरी ६५ लाखांची मागणी केली आहे. मात्र, हायपॉवर कमिटीने २५ लाख दर फायनल केला आहे. त्यामुळे ज्यांना जमीन द्यायची नाही त्यांच्यावर जबरदस्ती केली जाणार नाही. लवकरच भूसंपादन केलेल्या जमिनीबाबत डी नोटीफिकेशन ऑडर काढण्याची घोषणा उद्योग मंत्र्यांनी यावेळी केली.

**▶ उद्योग मंत्र्यांच्या घोषणा**

✻ चिंचोळी एमआयडीसी रस्ते विकासाठी ४ कोटी ३० लाख ✻ टेंभुर्णी एमआयडीसी रस्ते विकास ३ कोटी ७० लाख ✻ बार्शी एमआयडीसीची पाणी पुरवठ्यासाठी ४ कोटी ✻अक्कलकोट रोड एमआयडीसी रस्ते विकाासासाठी २० कोटी

CMYK

# वीज कनेक्शन तोडणी न थांबवल्यास मला रस्त्यावर उतरावे लागेल

## आमदार बबनदादा शिंदे यांचा इशारा

सुराज्य/टेंभुर्णी

**'वीज कनेक्शन तोडणी आता थांबवा व वीज जोडणी मोहीम तातडीने सुरू करा' शेतकरी प्रचंड आर्थिक अडचणीत आहे, उन्हाळा सुरू होत असून शेतीसाठी, पिण्यासाठी, लघु उद्योगासाठी पाणी व ते मिळण्यासाठी लाईट अतिशय महत्त्वाची आहे. शेतकऱ्याकडून वीज बिलाची कमीत कमी रक्कम वसूल करा परंतु, आगाऊ कुठलीही सूचना न देता वीज कनेक्शन तोडण्याची जिल्ह्यात सुरू केलेली मोहीम तातडीने बंद करा अन्यथा वीज मंडळाच्या विरुद्ध शेतकऱ्याचा प्रतिनिधी म्हणून मला स्वतःला, माझ्या हजारो कार्यकर्त्यासह रस्त्यावर उतरावे लागेल व नंतर होणाऱ्या परिणामास शासन व प्रशासन जबाबदार असेल असा इशारा आमदार बबनदादा शिंदे यांनी दिला.**

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ऊर्जामंत्री व संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रामध्ये आमदार बबनदादा शिंदे यांनी नमूद केले आहे की, सध्याची वीज तोडणी ही ८ ते १० दिवस कुठलीही आगाऊ सूचना न देता सुरू केलेली आहे. रब्बी गहू, ज्वारी, हरभरा या पिकांना शेवटचे पाणी देऊन ही पिके काढणी योग्य होत आहेत. तुटून गेलेल्या खोडवा-निडवा ऊसाला तसेच सुरू लागण झालेल्या व पक्की बांधणी झालेल्या उसाला तातडीने पाणी न मिळाल्यास लहान व कोवळे ऊस पिक जळून जाण्याची भीती निर्माण झालेली आहे.

सध्या कालव्यात पाणी चालू आहे. भीमा नदीत पाणी सोडून या नदीतील १७ व बोगद्यावाटे पाणी सोडून सीना नदीतील १४ बंधारे तसेच अनेक पाणीपुरवठा योजना द्वारे तलाव, शेततळी, ओढे, नाले, भरून घेण्यात आलेले आहेत. परंतु मुबलक पाणी असून देखील विजमंडळाकडून शेतीची वीज कनेक्शन्स तोडण्याचा सपाटा चालू झाल्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था दैवाने दिले पण कर्माने नेले, अशी होत आहे. नदी काठावरील गावोगावच्या तसेच अनेक वाड्यावस्त्यावरील पिण्याचा पाणीपुरवठा बंद पडलेला आहे. त्यामुळे नागरिकांना तसेच पशुधनासाठी पाण्यावाचून तडफडावे लागत आहे व अतिशय हाल चालू आहेत.

कडवळ, घास, मका, गजराज गवत इत्यादी चारा वैरणीची पिके पाण्याअभावी जळून जाऊ लागली आहेत.गावागावातील पिठाच्या गिरण्या बंद पडल्या आहेत, भात खाऊन लोकांना दिवस काढावे लागत आहेत, लहान उद्योग विजेअभावी



बंद पडले आहेत. शाळा, कॉलेज, बँका, पोस्ट, कॉम्प्युटर सेंटर्स आदी ठिकाणचा वीज पुरवठा बंद झाल्यामुळे सर्वत्र आर्थिक व इतर व्यवहार ठप्प झालेले आहेत, विद्यार्थ्यांची व ज्येष्ठ नागरिकांची प्रचंड गैरसोय झालेली आहे.

अनेक शेतकऱ्यांचे ऊस कारखान्याला गेलेले आहेत परंतु जिल्ह्यातील काही अपवादात्मक चार-पाच साखर कारखाने सोडले तर इतर कुठल्याही कारखान्यांनी दोन-दोन, तीन-तीन महिने झाले तरी अध्याप उसाची पहिली बिले देखील दिलेली नाहीत. त्यामुळे देखील शेतकरी मोठ्या अडचणीत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकऱ्यांच्या बाबतीत नेहमी सकारात्मक निर्णय घेतात असे वारंवार दिसून आलेले आहे. कनेक्शन तोडू नका वीज पुरवठा तातडीने सुरू करा, शेतकऱ्यांना व ग्रामीण भागातील जनतेला तातडीने दिलासा मिळावा अन्यथा शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून वीज मंडळाच्या विरोधात मला माझ्या हजारो कार्यकर्त्यासह रस्त्यावर उतरणे भाग पडेल हे निश्चित.'

अनेक शेतकऱ्यांना वीस मंडळाच्या डीपीवरून कनेक्शन देऊन सुद्धा मीटर दिलेले नाहीत, परंतु लाखो रुपयांची बोगस बिले मात्र दर महिन्याला मोबाईल मेसेज वरून पाठवून दिली जातात व आता मात्र सध्या चालू एक बिल किंवा पूर्वीचे बिल भरा म्हणून वीज महामंडळाच्या अधिकाऱ्याकडून शेतकऱ्यांना आग्रह केला जातो आहे.

या बोगस बिलांचे आकडे लाखो रुपयांमध्ये आहेत. म्हणून आता वीज मंडळाच्या वरिष्ठ अधिकार्यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्येक डीपीवरील कनेक्शन धारक शेतकऱ्यास कमीत कमी २ किंवा ३ हजार रुपये रक्कम घ्यावी व त्या डीपीवरील कनेक्शन्स ताबडतोब जोडून द्यावीत, जो शेतकरी वीज बिल भरेल त्याचे कनेक्शन लगेच जोडून द्यावे. काही शेतकरी वीज बिल भरत नाहीत व त्यामुळे वीज बिल भरणाऱ्या शेतकऱ्यांची मोठी कुचंबणा होते, याचाही वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी विचार करावा व आता वीज जोडणी करण्यासाठी शेतकऱ्याकडून पैशाची अडवणूक न करता तातडीने वीज कनेक्शन जोडण्याची मोहीम सुरू करावी, असे स्पष्ट मत आ. बबनदादा शिंदे यांनी व्यक्त केले.

> सीना भीमा नदीकाठ, कालवा, सिंचन योजना लाभक्षेत्रातील ग्रामीण भागातील ८० टक्के शेतकरी वाड्यावस्तीवर राहतात. त्यांना पाण्यासाठी नदी, कालवा, विहिरी बोअरवेलवर अवलंबून राहावे लागते आहे व यासाठी वीज पुरवठा चालू असणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या डीपी कनेक्शन कट झाल्यामुळे अनेकांना पाण्याची गंभीर समस्या भेडसावत आहे. यासाठी वीज वितरण विभागाने किमान दोन तास वीज पुरवठा सुरू करावा व वाड्या वस्तीवरील लाखो नागरिकांची पाण्याची समस्या दूर करावी.
>
> **- आ. बबनदादा शिंदे.**

## मानसिक त्रास दिल्याप्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा दाखल

**सुराज्य/सोलापूर :** लग्नात व चोळीच्या कार्यक्रमात आमचा मानपान केला नाही. आमच्या मुलींना आम्ही सासरी दोन ते तीन लाख रुपये दिले आहेत. तु ही माहेरून तीन लाख रुपये घेऊन ये असे म्हणून शारीरिक व मानसिक त्रास दिल्याप्रकरणी पतीसह चौघांवर विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी करिश्मा अमित होसमणी (रा. मंत्री चंडक विहार, आसरा चौक) यांनी पती अमित परशुराम होसमणी, सासरा परशुराम कृष्णात होसमनी, सासू सुरेखा परशुराम होसमनी व नणंद अंजली अक्षय बाकळे या चौघांनी मिळून शिविगाळ करून त्रास दिला. तसेच फिर्यादीच्या घरी येणाऱ्या नीता रोडगे हिला तू सारखी आमच्या घरी का येतेस असे म्हणून शिवीगाळ केली. या प्रकरणी विजापूर नका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास पोलीस हवालदार जाधव हे करत आहेत.

## मोटारसायकलच्या धडकेने वृद्ध ठार

**सुराज्य/सोलापूर :** लघुशंका करून रस्ता पार करून येत असताना जोराने आलेल्या मोटरसायकल क्रमांक एम.एच. १३.ई.ए.५५५३ च्या चालकाने जोरदार धडक दिली.

या घटनेत गंभीर दुखापत झाल्याने फकरुद्दीन हाजीसाब शेख (वय-७६) यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी फैजलबारी म. रहीम मुल्ला (वय-३१, रा. सलगरवाडी डोंणगाव रोड, सोलापूर) याच्या विरोधात मयताचा मुलगा इकबाल शेख (रा. नुरानी मस्जिद, रामवाडी सोलापूर) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक मंद्रुपकर हे तपास करत आहेत.

## घोषणाबाजी केल्याप्रकरणी काँग्रेस कार्यकर्त्यांवर गुन्हे

**सुराज्य/सोलापूर :** महापौर कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ऑफिससमोर जमावजमवून काँग्रेस पक्षाचा बॅनर लावून जोरदार घोषणाबाजी केल्याप्रकरणी विनोद भोसलेसह २४ जणांवर सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.शुक्रवारी आ. प्रणिती शिंदे यांनी रोहित पवार यांच्या विरोधात विधान केल्याने दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या कार्यालयासमोर फलक लावून जोरदार घोषणाबाजी केली.

राष्ट्रवादीच्या कार्यालयासमोर विनोद भोसले, अंबादास करुंगुळे, प्रवीण जाधव, महेश लोंढे, तिरुपती परकीपडला, शोहेब महागामी, श्रीकांत वाडेकर, इलियास शेख, शरद गुमटे, कुणाल गायकवाड, दीनानाथ शेळके, सुभाष वाघमारे, यासीन शेख, धीरज खंदारे, महेंद्र शिंदे, सौरभ साळुंखे, संकेत माने, सुरज कांबळे, बबलू शेख, गणेश वडेपल्ली, संजय गायकवाड, शाहरुख नदाफ, विवेक इंगळे, अल्ताफ विजापूरे अशा २४ जणांवर पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रभाकर देडे यांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल जाधव हे करत आहे.

## एसटी वाहकाची पळवली बॅग

**सुराज्य/सोलापूर :** शास्त्रीनगर एसटी बसस्थानक क्रमांक दोन येथील आगारात असलेल्या विश्रामगृहात विश्रांती घेत असलेल्या एसटी वाहक यांची १८ हजार ५०० रुपये रोकड असलेली बॅग अज्ञात चोरट्याने हातोहात लंपास केली.

वाहक विकास बाबुराव गंगावणे (वय-३५, रा. देवरुख भाटकर चाळ, संगमेश्वर जि. रत्नागिरी) हे शास्त्रीनगर येथे असलेल्या बस स्थानकाच्या विश्रामगृहात विश्रांतीसाठी थांबले असताना उशाला ठेवलेल्या पैशाची ट्रे पेटी ही कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. सदर बझार पोलीस ठाण्यात याबद्दल गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास पोलीस नाईक सरतापे हे करत आहेत.

## कार्यालयातील दोन लॅपटॉप पळवले

**सुराज्य/सोलापूर :** जुळे-सोलापुरातील ए. डी. जोशी जुनिअर कॉलेजसमोरील कार्यालयात ठेवलेले दोन लॅपटॉप अज्ञात चोरट्याने चोरून नेले. अजय इंद्रजीत सुरवसे यांच्या राहत्या घरासमोरील कार्यालयात ते लॅपटॉप होते. शटरला कुलूप लावलेले नव्हते. याची संधी साधून चोरट्याने दोन लॅपटॉप पळवले. अजय इंद्रजीत सुवरसे (वय-२६, मीरा पार्क) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गावडे हे करीत आहेत.

## कारमधील पर्स पळविली

**सुराज्य/सोलापूर :** सात रस्ता येथील साई सुपर मार्केट येथे कार पार्किंग करून माल खरेदीला गेलेल्या मानसी आनंद कुर्डूकर (वय-३२, रा. गुलमोहर कॉम्प्लेक्स, यतिराज हॉटेल जवळ, सोलापूर) यांच्या कार मधील १ हजार रुपये रोख रक्कम व पिवळ्या रंगाची पर्स अज्ञात चोरट्याने पळवून नेली.

याप्रकरणी मानसी कुर्डूकर यांनी फौजदार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करत आहेत.

# सहकार महर्षींना विविध ठिकाणी आदरांजली

सुराज्य/अकलूज

सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्त अकलूज येथे विविध संस्थांच्या वतीने त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

शिवरत्न बंगला येथे सहकार महर्षींच्या समाधी स्थळाची मोहिते-पाटील कुटुंबाकडून विधिवत पूजन करण्यात आले. विजय गणेश उत्सव मंडळ ट्रस्ट व सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्यावतीने सहकार महर्षींच्या प्रतिमेची मिरवणूक समाधी स्थळ ते कारखाना येथील त्यांच्या पुर्णाकृती पुतळ्यापर्यंत काढण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात जयघोष करत मिरवणुकीची शोभा वाढवली.



मिरवणुकीच्यानंतर कारखाना स्थळावरील पूर्णकृती पुतळ्याचे विधिवत पूजन करून कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रकाशराव पाटील यांनी केले. यावेळी कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन सावंत पाटील, संचालक रावसाहेब मगर, महादेव ठवरे, महादेव घाडगे, सुभाष पताळे, सिद शिंदे, मोहन लोंढे, भारत फुले, नाना काळे, राजेंद्र चौगुले, विजय गणेशोत्सव मंडळाचे ट्रस्टी लक्ष्मण आसबे, श्रीकांत राऊत, चंद्रकांत कुंभार, सचिव अभयसिंह माने देशमुख तसेच सर्व आजी माजी संचालक मंडळ उपस्थितीत होते.

याठिकाणी महर्षी प्रशाला लक्ष्मीबाई कन्या प्रशाला शिवरत्न शिक्षण संस्था या शाळेतील विद्यार्थ्यांनी महर्षी गीत तसेच त्यांच्या जीवनावरील मराठी हिंदी व इंग्रजी मधून भाषणे करून श्रद्धांजली वाहिली. शवामृत दूध संघ,शिवरत्न शिक्षण संस्था, ग्रीन फिंगर स्कूल, शंकर नगर ग्रामपंचायत, शंकर नगर विविध कार्यकारी सोसायटी येथे मदनसिंह मोहिते-पाटील यांनी आदरांजली वाहिली.

अकलूज नगरपालिका, कृषी उत्पन्न बाजार समिती, श्रीशंकर सहकारी साखर कारखाना, सुमित्रा पतसंस्था आदी ठिकाणी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांना आदरांजली वाहण्यात आली. जनसेवेच्यावतीने चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. सायंकाळी विजय चौक येथे संत निरंकारी सत्संग सोहळा झाला तर कारखाना स्थळावर विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्यावतीने सहकार महर्षी यांच्या पुतळ्याजवळ जयवंत महाराज बोधले यांचे श्रीहरी कीर्तन झाले.

## प्रा. बाळासाहेब शिंदे क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानित

**सुराज्य/सांगोला :** क्रीडा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करीत वाकी घेरडी येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन तथा सरपंच तसेच कै. सौ. वत्सलादेवी देसाई विद्यालय व कै. अण्णासाहेब घुले सरकार कनिष्ठ महाविद्यालय जवळे या प्रशालेचे प्राचार्य बाळासाहेब शिंदे सर यांना क्रिडा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र क्रिडा महासंघ संलग्न सोलापूर जिल्हा क्रिडा संघाच्यावतीने शनिवार दिनांक ११ फेब्रुवारी रोजी वडाळा येथील लोकमंगल कॉलेज येथे पुरस्कार सन्मान सोहळा संपन्न झाला.

माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख, माजी आमदार दत्तात्रय सावंत, जिल्हा क्रिडा अधिकारी नितीन तारळकर यांच्या हस्ते प्रा. बाळासाहेब शिंदे यांना क्रिडा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


प्राचार्य बाळासाहेब शिंदे यांनी क्रिडा शिक्षक असताना सलग १२ वर्षे कबड्डी खेळामध्ये विभागीय स्तरावर प्रथम संघ आणून राज्यस्तरावर संघाची निवड केली होती. यामध्ये त्यांचे योगदान मोलाचे होते.

यावेळी २२ कबड्डीपटू यांची नॅशनल कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली होती. चालू शैक्षणिक वर्षात देखील जवळे येथील २ कबड्डी संघाची विभागीय स्तरावर निवड झाली आहे.

## बाळासाहेब दीक्षित यांचे निधन

सुराज्य/अकलूज

माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथील बाळासाहेब एकनाथ दीक्षित यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा मुलगी असा परिवार आहे.



# कासेगावच्या जमीनवाटपाचा दावा दहा वर्षांनी निकाली

सुराज्य/सोलापूर

जिल्हा व सत्र न्यायालयात विधी सेवा प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये कासेगावच्या जमीनवाटपाचा दावा तब्बल दहावर्षांनी निकाली निघाला आहे.

शनिवारच्या लोकअदालतीत एकूण ३५ पॅनल तयार करण्यात आले होते. एकूण ८७ हजार ५२० खटल्यांची संख्या इतकी होती. त्यापैकी २०१२ मधील एक खटला हा पॅनल ३ चे प्रमुख एस. एन. रतकंठवार (सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर) यांच्याकडे मिटविण्यासाठी आला होता. यातील पक्षकार प्रभाकर दादाराव काळे (वादी), श्रीमती रुक्मीणीबाई गणपत काळे व इतर ७ जणांनी सोलापूर दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर येथे सरसनिरसन मानाने वाटणी होवून पृथक कब्जा मिळण्याचा दावा केला होता. कासेगांव येथील जमिनीबद्दल वाटपाचा दावा २०१२ पासून प्रलंबित होता. वादी व प्रतिवादी यांनी सामोपचाराने मिळकतीचा वाद भरत किसन खारे यांच्यामार्फत बोलणी होउन मिटविण्यात आला. तो वादाचा विषय तडजोडी स्वरुपात विनित उजळंबे यांनी कायदेशीर मुद्दे तपासून, कायदयाच्या चौकटीत बसवून तडजोड घडवून आणली. विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष व प्रमुख जिल्हा न्यायाधीश डॉ. शब्बीर अहेमद औटी, विधी सेवा प्राधिकरणचे सचिव नरेंद्र जोशी यांच्या सहाय्याने तडजोड घडवून आणला. १० वर्षानी निकाल लागला. या दाव्यामध्ये पॅनल प्रमुख रतकंठवार, पॅनल विधिज्ञ रईसा मदनी यांनी परिश्रम घेतले. वादीतर्फे विधिज्ञ अमरनाथ कनकी तर प्रतिवादी तर्फे विधिज्ञ एस. व्ही. उजळंबे, विधि विनित उजळंबे यांनी काम पाहिले.



# टेंभुर्णीतील बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**सुराज्य/सोलापूर :** श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित लक्ष्मी आनंद विद्यामंदिर अँड ज्युनिअर कॉलेज टेंभुर्णी येथील शैक्षणिक वर्ष २०२२ - २३ मधील इ. १२वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष योगेश तथा बाबाराजे बोबडे, सचिवा शिवमती सुरजा बोबडे, प्राचार्य राऊत व इतर सर्व शिक्षक उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष बाबाराजे बोबडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. सुषमा कोकाटे, प्रा. कोकाटे, प्रा. श्रीराम गिरी, प्रा.शरद देशमुख व प्रा. युवराज वजाळे, प्राचार्य श्रीकांत राऊत सर यांनीही विद्यार्थ्यांना येणाऱ्या परीक्षेसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. सूत्रसंचालन दीक्षा कोठावळे, प्रास्ताविक साक्षी देशमुख तर आभार सानिका गलांडे हिने व्यक्त केले

# तणावमुक्त जीवन जगण्यासाठी आरोग्याची काळजी घ्या

सुराज्य/सोलापूर

कामाला देव माना, कर्माला महत्व द्या, ताणतणावामुळे स्वास्थ्य बिघडते, म्हणून ग्रामसेविकांनी आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

सिंहगड शिक्षण संकुलात जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग व महिला बाल कल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमाने महिला ग्रामसेवकांसाठी महिला सक्षमीकरण व प्रशासकीय सुधारणा कार्यशाळा घेण्यात आली, त्यावेळी सिईओ दिलीप स्वामी बोलत होते. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, ग्राम पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, महिला व बाल कल्याण विभागाचे मोहीम अधिकारी जावेद शेख, गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे, वैद्यकिय अधिकारी डॉ. प्रभा साखरे, वैद्यकिय अधिकारी डॉ. शुभांगी तनपुरे, बालविकास प्रकल्प अधिकारी सुवर्णा जाधव, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, व्याख्याता सीता पाटील उपस्थित होते. महिला ग्रामसेविकांनी आपले कामकाज करताना महिला सरपंच व सदस्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव व ग्रामपंचायत कामकाजाविषयी महिती देण्याचे काम प्राधान्याने करणे गरजेचे असे इशाधीन शेळकंदे म्हणाले.



> **ग्रा.पं.अधिनियमाचा चांगला. अभ्यास कराः कोहिनकर**
>
> ग्रामपंचायतीच काम सक्षम पणे करणे साठी नियमांचा अभ्यास करा जेणे करून लोकांना वेळेत सेवा देता येतील असे मत अतिरिक्त सिईओ संदीप कोहिनकर यांनी व्यक्त केले. सरपंचांना अपात्र तोटी कारवाई केले नंतर एप्रिल करण्यासाठी व पडताळणीसाठी किती दिवसाचा कालावधी आहे? ग्रामपंचायतीचा नमुना रजिस्टर, सरपंच व उपसरपंच, मासिक सभा व ग्रामसभेचे अधिकार याबाबत उलट प्रसंगी विचारून मार्गदर्शन केले. परिपत्रक व वरिष्ठ कार्यालयाकडून येणारे पत्रव्यवहार याची काळजीने अभ्यास करा. अतिक्रमणाबाबत नियमांची माहिती करून घ्या. कामात यामुळे अडथळे निर्माण होणार नाहीत, असेही अतिरिक्त कोहिनकर यांनी सांगितले.

# गोवा बनावटीच्या विदेशी मद्याच्या ५२ पेट्या जप्त

**सुराज्य/सोलापूर :** उत्पादन शुल्क विभागांच्या माळशिरस, सांगोला तसेच अकलूज यांच्या पथकाने संयुक्तपणे केलेल्या कारवाईत डिकसळ हद्दीत जवळा-जत रस्त्यावर वाहतूक होणारी तसेच हॉटेल शिवनेरीमधील बनावट विदेशी गोवा राज्य निर्मित मद्याची ५२ पेट्या विदेशी दारु जप्त केली. तसेच दोन हजार बुचे, एक महिंद्रा बोलेरो, मारुती अल्टो व दुचाकी जप्त केली आहे.



उत्पादन शुल्क माळशिरस विभागाने डिकसळ येथे सापळा रचून बनावट गोवा राज्य निर्मित मद्य विक्री व वाहतूक करण्याच्या उद्देशाने मिळून आल्याने दोन आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यात १२ लाख ६० हजारांचे विदेशी बनावट गोवा राज्य निर्मित ३३ पेट्या मद्य, दोन वाहने असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तसेच दुय्यमनिरिक्षक सांगोला विभागाने येळवी-डिकसळ रोडवर सापळा रचून गोवा राज्य निर्मीत विदेशी मद्याच्या वाहतुकीवर कारवाई केली. या कारवाईत २ लाख ८३ हजारांचे बनावट गोवा राज्य निर्मित २० पेट्या विदेशी मद्य जप्त केले. एका गुन्हयात महेश दगडू शिंदे (वय २८, रा.डिकसळ) व रोहित राजाराम शिंदे (वय २४, रा. येळवी ता.जत) यांच्यावर तर दुसऱ्या गुन्ह्यात किरण बाळासाहेब साबळे (वय २३, रा. पारे, ता.सांगोला) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई अधीक्षक नितीन धार्मिक व उपअधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक संदीप कदम, दुय्यमनिरीक्षक कैलास छत्रे, सहायक दुय्यमनिरिक्षक रवी पवार, जवान तानाजी जाधव, तानाजी काळे, अशोक माळी यांनी केली.

# मंद्रुपच्या जागा शेतकऱ्यांना परत देण्याचे उद्योगमंत्र्यांचे आदेश

## मनिष काळजे यांच्या पाठपुराव्याला यश

**सुराज्यः** मंद्रुप येथील शेतकऱ्यांच्या एमआयडीसीसाठी संपादित केलेल्या जागा पुन्हा देण्याचा निर्णय उद्योगमंत्री उदय सामंत यांनी घेतला आहे. याबाबत बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख मनिष काळजे आणी संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत यांनी सामंत यांच्याकडे पाठपुरावा केला होता, अखेर त्याला यश आले आहे. एमआयडीसीला मंद्रूप येथील जागा देण्याच्या विरोधात शेतकरी आंदोलनास बसले होते. १४५ दिवस झाले आंदोलन चालू होते. काळजे यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना आंदोलन थांबवण्याचे आवाहन करत जागा त्यांना लवकर परत मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. याबाबत त्यांनी ना. सामंत यांना माहिती दिली होती. अखेर त्याला यश आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आंदोलन थांबणार आहे.



सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# राष्ट्रवादी प्रदेश युवक उपाध्यक्ष प्रशांत बाबर यांची पक्षातून हकालपट्टी

सुराज्य/सोलापूर

गेल्या काही दिवसांपासून सोलापूर शहरांमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यामध्ये लोकसभा निवडणुकीच्या खासदारकीवरून जो कलगीतुरा रंगला होता तो जरी आमदार रोहित पवार यांच्या सोशल मीडियावरील वक्तव्याने वादावर पडदा पडला आहे. मात्र याचा मोठा फटका राष्ट्रवादीचे नेते शरद पवार व आमदार रोहित पवार यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर यांना बसला आहे. त्यांची शहराध्यक्ष भारत जाधव यांनी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. शनिवारी संध्याकाळी त्यांनी पत्र काढून त्यात बाबर यांची हकालपट्टी करण्यात आल्याचे म्हटले आहे.

राष्ट्रवादी प्रदेश युवक उपाध्यक्ष या महत्त्वाच्या पदावर असताना पदाची जाण न ठेवता आपण सार्वजनिक ठिकाणी प्रदेश अध्यक्षांच्या बैठकीवेळी माध्यमांना प्रदेशाध्यक्ष विषयी चुकीची माहिती देणे, शहर निरीक्षकांच्या विषयी राष्ट्रवादी सोशल मिडियाच्या अधिकृत पेजवर बदनामी कारक विधान वापरून ग्रुपवर पोस्ट करणे व पक्ष कार्यकर्त्यामध्ये संभ्रम निर्माण करणे, शहराध्यक्ष यांना फोन वरून वादावादी करणे अशा गंभीर चुका आपणाकडून झाले आहेत. याबाबत आपल्याला वारंवार सूचना देण्यात आले असतानाही त्याकडे दुर्लक्ष करून कार्यकर्त्यांच्या मध्ये व महाविकास आघाडीमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण करत आहात.

त्यामुळे श्रेष्ठींच्या आदेशावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात येत आहे, असे शहराध्यक्ष जाधव यांनी पत्रात म्हटले आहे.

### माझी हकालपट्टी करण्याचा शहराध्यक्षांना नाही : बाबर



माझी हकालपट्टी करण्याचा शहराध्यक्ष भारत जाधव यांना कोणताही अधिकार नाही. मी पक्षाच्या हितासाठी कायम लढणारा माणूस आहे. गेल्या वीस वर्षापासून मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा सक्रिय कार्यकर्ता आणि पदाधिकारी आहेत. आदरणीय पवार साहेब आणि पवार कुटुंबावर नितांत श्रद्धा आहे आणि राहणार. पवार कुटुंबावर जो कोणी बोलेल त्याला आम्ही कायम विरोध करणार. सोलापूर शहर राष्ट्रवादीतील काही मंडळी वैयक्तिक स्वार्थासाठी प्रदेशअध्यक्ष आणि वरिष्ठ नेत्यांची दिशाभुल करत आहेत मी गेल्या वीस वर्षापासून पवार साहेबांचा कार्यकर्ता आहे आणि राहणार, असे प्रशांत बाबर यांनी म्हटले आहे.

# राजकीय वादातून ढेकरी येथे कुऱ्हाडीने मारहाण

सुराज्य/सोलापूर





राजकीय वादातून मासिक मीटिंगच्या वेळी कुऱ्हाड आणि लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली. ची घटना ढेकरी (ता. तुळजापूर) येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. अक्षय विजय भोसले (वय २८ रा.ढेकरी) असे जखमीचे नाव आहे. त्याला काल रात्री गावातील मासिक बैठकीच्या वेळी शिवाजी मधुकर रोडे, नितीन रोडे आणि अन्य सहा जणांनी कुऱ्हाड लोखंडी रॉड आणि लाथा बुक्क्याने मारहाण केली. त्याला उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

**आलेगाव येथे महिलेस लाथाबुक्याने मारहाण**

सोलापूर-शेत जमिनीच्या वादातून एका ३५ वर्षीय महिलेस गळा दाबून लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आली. ही घटना आलेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. संगीता श्रीमंत चोरमुले (वय ३५ रा. आलेगाव) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात राहुल (मुलगा) यांनी दाखल केले. त्यांना कांता यशवंत चोरमुले, सुनीता चोरमुले आणि अन्य तिघांनी गळा दाबून मारहाण मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

**नळदुर्ग येथे कंडक्टरला मारहाण**

नळदुर्ग बस स्थानकात तिकिटाचे पैसे आणि पैशाच्या कारणावरून कंडक्टरला हात पिरगाळून मारहाण करण्यात आली. ही घटना शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. परमेश्वर नाथराव केंद्रे (वय ३३ रा. येवलेवाडी जि.पुणे) असे जखमी झालेल्या कंडक्टरचे नाव आहे. त्यांना नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मझहर हमीद शेख या प्रवाशाने मारहाण केली अशी नोंद सिव्हील पोलिसात झाली आहे.

# आठ वर्षात भाजपचे खासदार पाणी योजना आणू शकले नाहीत : आ.प्रणिती शिंदे

**सोलापूर** : मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून देशात जातीपातीचे राजकारण सुरु आहे. सरकारने लोकहिताचे कुठलेही काम केले नाही. महागाई, बेरोजगारी वाढली. जातीपातीच्या राजकारणात निवडून आलेल्या सोलापूरच्या खासदारांनी आजपर्यंत संसदेत कोणतेही प्रश्न मांडले नाही. साधे एक पाण्याची पाईपलाईन सुद्धा आणु शकले नाही, अशी टीका आमदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.



जुना प्रभाग क्रमांक २० मध्ये होणाऱ्या हात से हात जोडो अभियानाच्या पूर्वतयारीसाठी नासीर बंगाली यांनी महत्वाची बैठक आयोजित केली होती, त्यावेळी आ. शिंदे बोलत होत्या. माजी मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी एनटीपीसीच्या माध्यमातून दुहेरी पाईपलाईन मंजूर करून आणली ते ही काम आजपर्यंत सुरु करू शकले नाही. काँग्रेस पक्षाने नेहमीच गोरगरीबांसाठी काम केले आहे. कोणतेही अडचण असू द्या मी तुमच्या सोबत आहे, असेही आ. शिंदे म्हणाल्या. या कार्यक्रमास शहराध्यक्ष चेतन नरोटे, नासीर बंगाली, तौफिक हत्तुरे, जुबेर कुरेशी, अंबादास बाबा करगुळे, शोहेब महागामी, नजीर नदाफ, वाहिद नदाफ, वाहिद बिजापुरे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# पुळूजवाडी येथे कोयत्याने मारहाण

**सोलापूर** : ऊस तोडीचे पैशाच्या हिशोबावरून कोयता आणि विळीने केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला ही घटना पुळूजवाडी (ता.पंढरपूर) येथे शुक्रवारी घडली.

शिशिर विनायक चव्हाण (वय २५ रा. पुळुजवाडी) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. नवनाथ भोसले, राजेंद्र गीते आणि अन्य दोन लोकांनी त्याला कोयता आणि विळीने मारहाण केली अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# संतांनी केलेले ओवीबद्ध लेखन त्यावेळच्या व्यवस्थेवर केलेले ओरखडे होते : पवार

**बार्शी** : मानव हाच साहित्याच्या केंद्रस्थानी असला पाहिजे. निसर्ग आणि संवाद महत्वाचा. समाज आणि साहित्य याचे नाते काय याचा विचार करता. साहित्य समाजावर प्रभाव टाकू शकतो. याचे उदाहरण रामायण व महाभारत होय. निसर्गाचा बिडघडलेला समतोल आहे.

लेखक हा समाजाशी बोलत असतो. प्रतिभा, कल्पना व वास्तव याचा मेळ घालत असतो. ज्ञानेश्वर-तुकाराम यांच्यासह संतांनी केलेले ओबीबद्ध लेखन त्यावेळच्या व्यवस्थेवर केलेले ओरखडे होते असे प्रतिपादन साहित्यिक तथा प्रकाशक सुनिताराजे पवार यांनी केले. शिवशक्ती अर्बन बँकेचे वतीने कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कर्मवीर व्याख्यान मालेत साहित्य आणि समाज या विषयावर पाहिले पुष्प गुंफताना बोलत होते.तीन दिवसीय व्याख्यान मालेचा शुभारंभ आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ बी वाय यादव, ज्येष्ठ साहित्यिक प्रा.राजेंद्र दास, बँकेचे चेअरमन डॉ प्रकाश बुरगुटे, व्हा. चेअरमन अशोक जगदाळे,प्राचार्य व न इंगळे, व्ही एस पाटील, अरुण देबडवार,चंद्रकांत मोरे आदी उपस्थित होते.

सुनीताराजे म्हणाल्या, राजकारणाचा साहित्यावर प्रभाव असतो तसेच प्रत्येक क्षेत्रात राजकारणात असते. वैचारिक क्रांतीतून निर्माण झालेले साहित्य हे महत्त्वाचे. संत ज्ञानेश्वर महाराज यांनी सांस्कृतीक लोकशाही आणली. सर्वांसाठी एक वाट करून दिली. मंदिरांच्या रांगा जेव्हा ग्रंथालयाकडे जातील तेंव्हा भारत महासत्ता होईल. साहित्यकानीं





काय लिहायचं नाही याचा विचार करावा असे आवाहन ही पवार यांनी केले. सूत्रसंचालन संचालक अशोक वाघमारे व हनुमंत चव्हाण यांनी केले. तर आभार शाखाधिकारी समाधान राऊत यांनी मानले. व्याख्यान माला यशस्वी करण्यासाठी सरव्यवस्थापक भारत उमाटे, सहा. सरव्यवस्थापक गणेश बारंगुळे यांच्या नेतृत्वाखाली सर्व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# शेतकऱ्यांचे महावितरणाला एक रूपयाही देणे लागत नाही

**▸ शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सारोडे यांचा दावा...**

सुराज्य/पंढरपूर

शेतकरी हा सरकारला व महावितरणला एक रूपया सुद्धा देणे लागत नाही. याउलट प्रत्येक शेतकऱ्यांची लाखो रुपयांची येणेबाकी महावितरण व सरकारकडे आहे. आधी ती परत करावी मगच कृषीपंप बंद करण्याची कार्यवाही करा अन्यथा शेतकरी शेकडोंच्या संख्येने रस्त्यावर उतरतील असा इशारा शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ सारोडे यांनी पंढरीत पत्रकार परिषदेमध्ये दिला.

ग्रामीण भागात थकबाकी असणाऱ्यांची वीज तोडणी सुरू असून या विरोधात शेतकरी संघटनेने पत्रकार परिषद घेतली. यास बाळासाहेब वाळके, गणेश जुदगर, सिद्दराम काकनगी, प्रतापराव येलपले, नितीन नरळे, सिध्देश्वर पाटील, नामदेव जानकर, गणेश चोपडे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना सारोडे यांनी, राज्य सरकारने सवलतीत जे बीज अनुदान महावितरणला दिले. त्या प्रमाणात वीज शेतकऱ्यांना अजिबात दिली जात नाही व दिली तर कमी दाबाने दिली जात आहे. सरकारने अनुदान देण्याचा निर्णय घेतला असताना ही त्याची अमंलबजावणी होत नाही. केवळ आठ तास वीज सध्या दिली जात आहे. तसेच सरकारच्या चुकीच्या धोरणाने शेतीमालास मुद्दलात ४०%



ते ७०% तोटा होतो तो फरक शेतकऱ्यांना सरकारने शेतकऱ्यांना देणे गरजेचे आहे.

राज्य सरकाने केंद्र सरकारला दिलेल्या अहवालात उत्पादन खर्चात विजेचा खर्च दिलेला नाही. यामुळे शेतकरी सरकारचे देणे नसून सरकारच शेतकऱ्यांचे देणे आहे असा दावा केला. याबाबत लाखो शेतकऱ्यांना नाहिती नसून आम्ही वारंवार वीज बिल भरू नका असे सांगत आहोत असे सांगितले. आम्ही न्यायालयात देखील दाद मागितली असून यावर अद्याप निर्णय प्रलंबित आहे. मात्र कोणत्याही शेतकऱ्याची वीज तोडल्यास आमच्याशी संपर्क साधावा आम्ही त्यांना बीज बिल न भरता बीज जोडणी करून देऊ असे आवाहन बाळासाहेब वाळके यांना केले. यानंतरही वीज तोडणी सुरूच राहिल्यास शेतकरी संघटना मोठे आंदोलन करणार असल्याचा इशारा वाळके यांनी यावेळी दिला.

# रुग्णास मारहाण; आठ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर** : माझ्या आई सोबत वाद घालून शिवीगाळ का केली असे विचारल्याच्या कारणावरून तरुणास शिवीगाळ करत डोक्यात फरशी घालून जखमी केल्याप्रकरणी आठ जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.७ फेब्रुवारी रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास बुधवार पेठ मिलिंद नगर येथे घडली.

याप्रकरणी निहाल राजेश बाबरे (वय-२४, रा.बुधवार पेठ, मिलिंद नगर) याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून किरण साळवे, सुधीर साळवे, मनीष किरण साळवे, प्रतीक साळवे, यश साळवे, संकेत साळवे, प्रतिभा साळवे, अर्चना सुधीर साळवे (सर्व रा.बुधवार पेठ, मिलिंद नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक भद्रशेट्टी हे करित आहे.





# सहकार महर्षी हे संघर्षवादी नेतृत्व : प्रा.मगर

**अकलूज** : सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी आयुष्यात त्यांनी अनेक प्रकारचे संघर्ष करीत माळशिरस तालुक्यात सर्व क्षेत्रात क्रांती केली. जनहितासाठी नेहमीच त्यांनी संघर्ष केला त्यामुळे ते एक संघर्षवादी नेते होते असे मत प्रा.दत्तात्रय मगर यांनी व्यक्त केले. अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात शनिवारी शंकरराव मोहिते पाटील यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ.दत्तात्रय बागडे हे अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख वक्ते म्हणून इतिहास विभागाचे प्रा. मगर हे उपस्थित होते. डॉ.बागडे यांनी शंकरराव मोहिते-पाटील यांनी माळशिरस तालुक्यात विकासाची गंगा आणल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी डॉ.हनुमंतराव आवताडे, प्रा.राजकुमार इंगोले महाविद्यालयाचे प्रबंधक युवराज मालुसरे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.सी.बी.लोंढे यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.जनार्धन परकाळे यांनी केले.

# पिलीव येथे उद्या शिवआरोग्य शिबिर


सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे रविवार १२ फेब्रुवारी रोजी युवा सेनेचे महाराष्ट्र राज्य विस्तारक उत्तम आयवळे, सहसचिव स्वप्नील वाघमारे व सोलापूर जिल्हाध्यक्ष गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अध्यक्ष सुभाष काकडे व उपाध्यक्ष डॉक्टर निलेश कांबळे यांच्या संकल्पनेतून शिव-आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. लाईफलाईन हास्पिटल येथे सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत हे शिबिर होणार आहे.

यामध्ये मोफत डोळे तपासणी व डोळयावरील सर्व आजारावर उपचार तसेच चष्माचा अचुक नंबर काढणे, अल्पदरात चष्मे वाटप, मोतीबिंदू ऑपरेशन करणयात येणार आहे. पिलीव परीसरातील नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुभाष काकडे यांनी केले आहे.

# आमदारांच्या उपस्थितीत तपासली कत्तलखान्याची कागदपत्रे


सुराज्य/सोलापूर



सोलापूर-हैदराबाद महामार्गावरील मुळेगाव तांड्याजवळील सोनांकुर यांत्रिक कत्तलखान्यामुळे प्रदूषण होत असल्याची तक्रार आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी विधिमंडळात केली होती. त्यानंतर पहिल्यांदाच जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी त्यासंबंधीची आढावा बैठक घेतली. या बैठकीत कत्तलखान्याने आवश्यक त्या परवानगी घेतल्यात की नाही? यासंबंधीची सर्व कागदपत्रे आ. कल्याणशेट्टी यांच्या समक्षच तपासली.

गुरुवारी, जिल्हाधिकारी कार्यालयात सोनांकुर कत्तलखान्याविषयी आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक पार पडली. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी, प्राणीमित्र विलास शहा, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त भास्कर पराडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन.एल. नरळे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आदी उपस्थित होते. शिवाय सोनांकुर कत्तलखान्यातील दूषित पाण्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे नुकसान होत असून प्रदूषणात दिवसेंदिवस वाढच होत असल्याचा मुद्दा आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान अधिवेशनात मांडला. यासंबंधीची संपूर्ण चौकशी केली जाईल, त्याचा चौकशी अहवाल आल्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाईल, असे उत्तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. त्यानुसार सोनांकुर कत्तलखान्याने घेतलेल्या परवानगी आणि त्याविषयीच्या कागदपत्रांची शहानिशा जिल्हाधिकाऱ्यांनी केली.

> कत्तलखान्याची कागदपत्रे पाहिली आहेत. विधी मंडळात काय आश्वासन दिले याची माहिती मागवली आहे. सर्व कागदपत्रे पडताळून पुढील निर्णय घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी शंभरकर यांनी सांगितले.




# शकुंतला महाडिक यांची अन्नछत्र मंडळाला भेट

**अक्कलकोट** : तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाला नुकतेच भेट दिली. मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या समवेत गायत्री कुपेकर, विजया खांडवे, रेश्मा महाडिक हे उपस्थित होते. यावेळी मंडळाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, बाळू पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर,धानू उमदी, बाळासाहेब घाडगे, पिंटू साठे, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे आदी उपस्थित होते.

# भाजपा नेते भारतीय यांच्यावर २०२४ ची खास जबाबदारी

**नाशिक** : भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यकारिणीची बैठक नाशिक येथे सुरू आहे. या बैठकीत पक्षाच्या भविष्यातील वाटचालीसह अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर विचारविनिमय सुरू आहे. निर्णयही घेतले जात आहे. आगामी काळातील निवडणुकी स्वबळावर लढायच्या आणि जिंकायच्याही असा निर्धार करण्यात आला आहे.



यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील आमदार श्रीकांत भारतीय यांच्यावर सोपविण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत घोषणा केली. भारतीय जनता पार्टीला स्वबळावर सत्तेवर आणण्यासाठी नियोजन करण्यात येत असून नाशिक येथे शनिवारी प्रदेश कार्यकारणीच्या बैठकीत अजेंडा ठरविण्यात आला. भाजपाची राज्य कार्यकारिणीची बैठक गेले दोन दिवस नाशिकमध्ये सुरू आहे. नवे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेली ही पहिली बैठक होती. जास्तीत जास्त मतदार पक्षाकडे कसे वळतील, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे मतदार भाजपकडे कसा खेचता येतील आणि त्यातूनच आगामी निवडणुकीत विजय कसा साकार करता येईल, याचा आडाखा या बैठकीत मांडण्यात आला.

# कालिचरण सोलंकर कामगार केसरी; आरु खांडेकर कुमार केसरीचे मानकरी

सुराज्य/पिलीव

महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाच्या वतीने दरवर्षी घेण्यात येत असलेल्या महाराष्ट्र कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धा राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा मुंबई या ठिकाणी पार पडली. यामध्ये सद्‌गुरूरु कारखान्याचे कामगार मल्ल कालीचरण सोलंकर यांनी कामगार केसरी व आरु खांडेकर यांनी कुमार केसरी कुस्ती जिंकून प्रथम क्रमांकाचा मान मिळवला.

महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री सुरेश खाडे यांचे हस्ते गदा, स्मृती चिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन या मल्लांना सन्मानीत करण्यात आले. कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरी राव,व्हा.चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील, सी एफ ओ रोहीत नारा व सर्व संचालकांनी विजयी मल्लांचा सन्मान



केला. कामगार केसरी हा किताब सलग पाचव्या वर्षी सद्गुरुच्या शिरपेचात रोवल्याचा आनंद पुर्ण पश्चिम महाराष्ट्रात होत आहे. त्यांचे सीईओ आण्णासाहेब शेंडे, जनरल मॅनेजर रामाराव, तसेच एच आर अँडमिन मॅनेजर सचिन खटके व कारखान्याचे अधिकारी, पदाधिकारी व वस्ताद महादेव ठवरे, अमोल मदने, मोहन मदने, दिलीप शेंबडे, खांडेकर, बडरे, दगडे आदींनी अभिनंदन केले.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: बार्शी तालुक्यातील लोकांना या नोटीसीने कळविणेत येते की,

डि।। सोलापूर डि।। व ता. बार्शी पैकी बार्शी नगरपालिका हद्दीतील जमिन ग.नं. ११९९/१ पैकी हे क्षेत्र ००=८१ आर यासी चतु:सिमा पूर्वेस- व्हेल शेलगांव रस्ता, दक्षिण- ग.नं.११९९/२, पश्चिम- ग.नं.१२९७, उत्तर- ग.ट.नं.१२०८ येणेप्रमाणे जमिन आतील तद्‌गभूत वस्तूसह वर्णनाची जमिन श्री. सचिन रामलिंग नलवडे यांचे प्रत्यक्ष कब्जे मालकी वहिवाटीची आहे.

उपरोक्त जमिन मालकानी उपरोक्त नमूद जमिन त्यांचे प्रापंचिक व कायदेशीर निकडीपोटी विक्रीस काढलेली आहे. त्याबाबत आमचे अशिल उपरोक्त जमिन मालकाशी बोलणी करुन खरेदीचे अनुषंगाने व्यवहार ठरविलेला आहे. व्यवहार ठरतेवेळी उपरोक्त जमिन निर्वेध निजोखमी, बिनबोजाची असलेची खात्री जमिन मालकांनी दिलेली आहे. तरीही कोणीही उपरोक्त जमीनीबाबत साठेखत, गहाणखत, भाडेपट्टा, खरेदीखत वा अन्य तत्सम स्वरुपाचा दस्त केलेला असलेस, वा सदर क्षेत्रास कोणाचेही कोणतेही स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत कागदोपत्री समक्ष खात्री करुन लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची तक्रार/हरकत न आल्यास सदर जमिन निर्वेध, निजोखमी समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदी करतील. नंतर कोणाचीही तक्रार/हरकत आमचे अशिलाचे खरेदी मालकी वहिवाटीवरती बंधनकारक राहणार नाही.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर प्रसिध्दीकरण केले असे. ता. १२/०२/२०२३.

सही/-
अशिलातर्फे
**ॲड. श्री.संभाजी शिवाजीराव पाटील**
साई, जगदाळे मामा हॉस्पीटल शेजारी,
शिवाजीनगर, बार्शी, ता.बार्शी, जि. सोलापूर.
मो. ९५५२४८८८५४
७२७६७३८२८४

**सही/-**
**अशिल**


CMYK

# सराफ व बेर्डे यांनी मराठी चित्रपटसृष्टी जिवंत ठेवली

## अभिनेत्री निवेदिता सराफ यांचे प्रतिपादन

सुराज्य/सोलापूर

**अभिनेते अशोक सराफ व लक्ष्मीकांत बेर्डे यांनी मराठी चित्रपटसृष्टी जिवंत ठेवली. आता दमदार असे चित्रपट येत आहेत. पुन्हा मराठी चित्रपट सृष्टीची क्रेज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन अभिनेत्री निवेदिता जोशी-सराफ यांनी केले.**



### महाविद्यालयीन युवकांसाठी नाटक फ्री

महाविद्यालयीन युवकांनी नाटकाकडे वळले पाहिजे. त्यांना नाटक बघण्याची गोडी निर्माण व्हावी या उद्देशातून मी स्वरा आणि ते दोघं हे नाटक युवकांनी पहावं. यासाठी महाविद्यालयीन मुलांसाठी हे नाटक फ्री ठेवण्यात आले आहे. आयडी कार्ड दाखवून त्यांना हे नाटक मोफत पाहता येईल. ही योजना स्तुत्य आहे. यामुळे युवक वर्ग नाटकाकडे वळेल, अशी अपेक्षा अभिनेता निवेदिता जोशी - सराफ यांनी यावेळी व्यक्त केली.

मी स्वरा आणि ते दोघं या नाटकासाठी अभिनेत्या तथा नाट्यकलावंत निवेदिता जोशी-सराफ या सोलापुरात आल्या असताना श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित वार्तालाप कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी मंचावर या नाटकातील कलावंत विजय पटवर्धन, सुयश टिळक, रश्मी अनपट तसेच नाट्यपरिषद उपनगरीय शाखेचे प्रशांत बडवे, शिवाजी उपरे आदी मान्यवर उपस्थित होते. या वार्तालाप कार्यक्रमात उपस्थित कलावंतांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना दिलखुलासपणे उत्तरे दिली. अभिनेत्या निवेदिता जोशी - सराफ यांनी यावेळी मी स्वरा आणि ते दोघं हे नाटक प्रेमाकडे बघण्याचा दृष्टिकोन सांगतो असे स्पष्ट करतानाच या नाटकाच्या निर्मिती मूल्यात कुठेही कमी न ठेवता हे नाटक दिग्दर्शक व या सर्व टीमने सादर केले आहे. त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. नाजूक विषयावरील हे नाटक आहे. कोरोना महामारीनंतर हे नवकोरं नाटक आणले. सर्व वयोगटातील लोकांना हे नाटक पाहता येईल, असे त्या म्हणाल्या.

नाटकांमध्ये होणाऱ्या बदलाबद्दल बोलताना निवेदिता जोशी-सराफ म्हणाल्या, यापूर्वी टिळक आणि आगरकर हे नाटक केलं होतं. त्यास त्यावेळी भरभरून येणारा प्रेक्षक वर्ग आम्ही पाहिला. दरम्यानच्या काळात थोडा प्रतिसाद कमी होता मात्र आता पुन्हा नाटकाला चांगले दिवस आले आहेत. चांगला प्रेक्षकवर्ग मिळत आहे.मराठी चित्रपट सृष्टी मध्ये अनेक स्थित्यंतरे घडली यासंदर्भात बोलताना निवेदिता जोशी-सराफ म्हणाल्या, १९९० मध्ये अभिनेते अशोक सराफ आणि लक्ष्मीकांत बेर्डे या दोन कलाकारांमुळे मराठी चित्रपट सृष्टी टिकून राहिली. त्यावेळी बंगली, गुजराती चित्रपट सृष्टी संपली. मात्र या दोघांनी त्यांच्या अभिनयाने या चित्रपट सृष्टीला तारले. त्यांनी ही चित्रपटसृष्टी जिवंत ठेवली. मोठ्या हिमतीने प्रयत्न केला. आता नवे चित्रपट येत आहेत. पुन्हा या चित्रपटसृष्टीला नवी क्रेझ खेचून आणण्यात यश आले आहे. नवे दमदार चित्रपट येत आहेत. ही निश्चितच आनंदाची आणि समाधानाची बाब आहे, असेही त्या म्हणाल्या. प्रारंभी श्रमिक पत्रकार संघाचे उपाध्यक्ष सागर सुरवसे, किरण बनसोडे, डॉ. रमेश पवार, अजित उब्रजकर यांच्या हस्ते या कलावंतांचा सत्कार करण्यात आला. आफताब शेख यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.



## वेळापूर येथे रमाई यांची जयंती साजरी

**वेळापूर** : वेळापूर फुले शाहू आंबेडकर नगर येथे प्रदीप सरवदे यांच्यावतीने माता रमाई आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, अशोक बनसोडे, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. धनंजय साठे, बहुजन मुक्ति पार्टीचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब जाधव, रायचंद खाडे, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, गोपाळ घाडगे, उघडेवाडी उपसरपंच सौ सिमाली धनंजय साठे, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा महिला उपाध्यक्षा व नूतन तंटामुक्ति समिती उपाध्यक्षा सौ.अश्विनी उमेश भानवसे, वेळापूर ग्रामपंचायत सदस्य सीमा रायचंद खाडे, दिलीप बनसोडे, महेंद्र साठे, धनाजी धांडोरे, रणजीत सरवदे, अमोल साठे, कार्यक्रमाचे आयोजक प्रदीप सरवदे, माधुरी मोरे, सुवर्णा सरवदे, सोनाली धांडोरे यांच्यासह महिला उपस्थित होत्या. यावेळी रमाई माता आंबेडकर यांच्या जीवनावर धनंजय साठे आदींनी विचार व्यक्त केले. आभार प्रदिप सरवदे यांनी मानले.

## डी.एम.युवक प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांची निवड

**सोलापूर** : डी.एम.युवक प्रतिष्ठानतर्फे (सात रस्ता) शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यासाठी गोविंदश्री मंगल कार्यालय येथे पदाधिकाऱ्यांची निवड व वार्षिक आढावा बैठकमंडळाचे संस्थापक अध्यक्ष निखील भोसले यांच्या अध्यक्षतेखाली व पृथ्वीराज माने यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. नवीन पदाधिकारी म्हणून सनी देवकते यांनी अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली तसेच उपाध्यक्ष तेजस साबळे, प्रथमेश गायकवाड, सचिव निखील खांदगे, सहसचिव शुभम ताकमोगे, खजिनदार प्रवीण झिंजुर्डे, कार्याध्यक्ष वसीम उस्ताद, मिरवणूक प्रमुख नितीन भोपळे-पाटील, श्रीकांत मेलगे-पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. या बैठकीस आकाश जाधव, धनराज शिंदे, शाम कदम, अक्षय जाधव, स्वप्निल मोरे, बाळकृष्ण जाधव, श्रीकांत कोळी, आकाश पवार आदी उपस्थित होते.

## बॉडी बिल्डिंग व फिटनेस फेडरेशनची कार्यकारिणी जाहीर

**सोलापूर** : सोलापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग व फिटनेस फेडरेशनची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी संतोष पवार यांची निवड करण्यात आली आहे. इतर कार्यकारिणी पुढीलप्रमाणेः कार्याध्यक्ष - अनिल जाधव, उपाध्यक्ष - रवींद्र पाटील, शशिकांत अक्कलवाडी, संजय हिरेमठ, जनरल सेक्रेटरी - विशाल गायकवाड, खजिनदार - अन्वरहुसेन शेख, सह सचिव आतिक नदाफ, कार्यकारिणी सदस्य - माळशिरस - आसिर दुरुगकर, पंढरपूर - गणेश साळुंखे, दक्षिण सोलापुर - शरणकुमार कुंभार , माढा- रोहित डावरे, अक्कलकोट - सिध्दाराम पाटील, करमाळा - विशाल जाधव, तर सोलापूर शहर राम आडम, विशाल विधाते, गणेश बासुतकर, अमोल लांडगे, तौफिक शेख, राज बंदिछोडे यांची निवड करण्यात आली आहे.

## जी. के.संस्थेतर्फे रोहिदास जयंती साजरी

**सोलापूर** : संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त जी. के. मागासवर्गीय बहुद्देशीय संशोधन संस्थेतर्फे मध्यवर्ती जयंती उत्सव संगमेश्वर महाविद्यालय, सात रस्ता येथे रोहिदास यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना करण्यात आली. संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलन उद्योगपती व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, रिपाइं (गवई गट) प्रदेश अध्यक्ष सुबोध वाघमोडे, ओमसाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवराज गायकवाड, उत्सव समिती अध्यक्ष राम हुंडारे व जी. के. संस्था अध्यक्ष संतोष गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

# जानेवारीत शहरातील ६ हजार २८९ टन कचरा उचलला

## महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत नियोजन



सुराज्य/सोलापूर

### सकाळच्या शिफ्टमध्ये १९० घंटागाड्यांचा वापर

सकाळच्या शिफ्ट मध्ये एकूण १९० घंटागाड्या कचरा संकलनासाठी शहरात सोडल्या जातात तर आर.सी. गाड्या १२ वापरल्या जातात तसेच दुपारच्या दुसऱ्या शिफ्ट मध्ये एकूण ३० घंटागाड्या आणि ४ आर.सी. गाड्यांचा वापर केला जातो. एक फेब्रुवारीपासून दुसरी शिफ्ट सुरू करण्यात आली आहे. त्याचा चांगला परिणाम दिसून येत आहे. यामुळे उद्या उचलण्यात येणारा कचरा आजच उचलण्याचा फायदा होत असल्याने कचरा संकलन वाढले आहे.

### दुसऱ्या शिफ्टमुळ रोज ३० टन कचरा संकलनात वाढ

या दुसऱ्या शिफ्ट मध्ये दररोज ३० टन कचरा संकलनात वाढ झाली आहे तर सकाळच्या पहिल्या शिफ्ट मध्ये सरासरी २०२ टन कचरा संकलित केला जातो. यामुळे शहर कचरामुक्त होण्यास मोठी मदत झाली आहे. पूर्वीप्रमाणे आता शहरात कुठेही इतरत्र कचरा दिसून येत नाही.

महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाअंतर्गत जानेवारी २०२३ या महिनाभरात ६ हजार २८९ टन कचरा घंटागाडीच्या सहाय्याने उचलण्यात आला आहे. सरासरी रोज २०२ टन कचरा उचलण्यात येत असल्याची माहिती घनकचरा विभागाचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांनी दिली.

महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली हे व्यवस्थापन करण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या अंतर्गत शहरातील कचरा संकलन केला जातो. दररोज सकाळ व दुपारी अशा दोन शिफ्टमध्ये घंटागाडीच्या साह्याने कचरा संकलन करण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी पदभार घेतल्यानंतर दुपारच्या दुसऱ्या शिफ्टमध्येही घंटागाडीच्या साह्याने शहरातील कचरा संकलनाचे काम हाती घेण्यात आले. त्याचा चांगला परिणाम दिसून येत आहे.

## शाहू महाराज मंडळातर्फे बौद्ध वधू-वर मेळावा

सुराज्य/सोलापूर

समाज कल्याण केंद्रामध्ये भव्यब बौद्ध धर्मीय मेळावा राजर्षी छत्रपती शाहू महाराज वधू-वर सूचक मंडळातर्फे आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या पुष्पा गायकवाड या होत्या.


आजच्या धक्काधुकीच्या युगात आणि विज्ञानाच्या जगात दोघेही पालक नोकरीच्या निमित्ताने व्यस्त असतात. त्यांच्याकडे वेळेचा अभाव असतो. वधू-वर मेळाव्यात अनेकांशी संपर्क येता त्यामुळे 'वधू-वर सूचक मेळाव्याची आज नितांत गरज असल्याचे गायकवाड यांनी सांगितले. सूत्रसंचालन सुरेखा गायकवाड यांनी केले तर संस्थेचे संस्थापक जालिंदर मसलखांब यांनी प्रस्तावना केली आहे. प्रमुख पाहुणे ॲड. सदाफुले यांनी कायदेविषयक सल्ला दिला कार्यक्रमासाठी ज्योती मसलखांब, नागेश कांबळे, इंगळे मामा, के. व्ही. गायकवाड, पंकज ढसाळ, पांडुरंग मसलखांब आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# आ.कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून आचेगांवला कोट्यवधीचा निधी

**बलवान गोतसुर्वे यांची माहिती**

**अक्कलकोट** : अक्कलकोट मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ अंतर्गत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी आचेगांव व हंजगी साठी महत्वपूर्ण असा आचेगांव ते हंजगी रस्त्यासाठी २ कोटी ८५ लाख इतका निधी मंजूर केला आहे.

त्याचबरोबर इतर योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात आचेगांवला निधी दिल्याची माहिती भाजपा अनुजाती दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष बलवान गोतसुर्वे यांनी दिली. आचेगांव ते हंजगी रस्त्यासाठी आचेगांव व हंजगी भाजप पदाधिकारी आ. कल्याणशेट्टी यांच्याकडे पाठपुरावा करीत होते. परंतु सत्ते अभावी प्रलंबित असलेले काम भाजप सत्ता आल्यानंतर तात्काळ मार्गी लावून आचेगांवकरांना दिलासा दिला. त्याचबरोबर सामाजिक न्याय विभागामार्फत आचेगांव बुद्धविहार समोर सभामंडप १० लाख, व्यायामशाळा ७ लाख व यापूर्वी आचेगांव ते इंगळगी रस्त्यासाठी ३ कोटी मंजूर केले होते ते काम पूर्ण झाले असून त्याचबरोबर जलजीवन मिशन योजने अंतर्गत हालचिंचोळी तलाव येथे नवीन विहीर, पाईप लाईन, पाणी टाकी हर घर नल यासाठी १ कोटी २ लाख मंजूर केला असून काम प्रगतीपथावर असल्याचे गोतसुर्वे यांनी सांगितले.



# जिल्हा स्काऊट गाईड मेळाव्यात विविध कार्यक्रम

**सोलापूर** : बार्शी तालुक्यातील खांडवी येथे आयोजित जिल्हा स्काऊट गाईड मेळाव्यात विविध शैक्षणिक उपक्रमासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.१४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान आयोजित मेळाव्यात जिल्ह्यातील स्काऊट गाईडच्या पंधराशे विद्यार्थ्यांनी सहभाग होत असून संचलन, शेकोटी कार्यक्रम, तंबू सजावट, बिन भांड्यांचा स्वंयपाक, शारीरिक व प्रात्यक्षिके, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्न मंजुषा स्पर्धा, धावणे स्पर्धा, विविध साहसी व मनोरंजनात्मक कार्यक्रम आदी विविध कार्यक्रमाद्वारे आपली कला सादर करणार आहेत. यासह सर्वात जास्त युनिट नोंदणी केलेले शाळांचे सन्मान, उत्कृष्ट गटशिक्षणाधिकारी, उत्कृष्ट विस्ताराधिकारी, उत्कृष्ट केंद्रप्रमुख व जिल्हास्तरीय उत्कृष्ट स्काऊट गाईडर पुरस्कार वितरण आदी कार्यक्रम होणार आहेत.

सोलापूर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेनुसार 'बेटी बचाव बेटी पढाओ' या उपक्रमांतर्गत स्काऊट गाईड कार्यालयामार्फत जिल्ह्यातील ११ विद्यार्थीनीना सायकल वाटप करण्यात येणार आहे.दि.१६ रोजी बक्षीस वितरण होणार आहे जिल्ह्यातील सर्व शाळांनी सहभाग घेण्याचे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय जावीर यांनी केले आहे. मेळाव्याच्या नियोजन संदर्भात गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, कार्यालय कर्मचारी यांच्या उपस्थितीत आयोजित मार्गदर्शन सभेत शिक्षणाधिकारी संजय जावीर यांनी आवाहन केले.



# उडगी जि.प.शाळेचे स्नेहसंमेलन जल्लोषात साजरे



**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील उडगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी व कन्नड शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. अध्यक्षस्थानी धोंडप्पा यळमेली होते. प्रथमतः सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन महादेव बनसोडे व बसवराज कोळी यांच्या हस्ते करण्यात आले.

स्टेज पूजा यलप्पा माशाळे, रामचंद्र म्हेत्रे तर दीपप्रज्वलन भीमाशंकर बिराजदार, नसरुद्दीन मुल्ला, राजू पाटोळे, रमेश जिगजंबगी, आकाश भांड तर वाद्यपूजा किसन राठोड,डॉ. बसवराज नंदीकोले यांच्या हस्ते करण्यात आले. स्नेहसंमेलनचे उद्घाटन चनबसप्पा कात्राबाद यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपशिक्षक भीमाशंकर नामतुरे यांनी तबल्याची सुंदर साथ दिली. प्रमुख पाहुणे म्हणून पंचप्पा शिवमूर्ती, संजय जानराव,महादेव धानशेट्टी, सुरेश बिराजदार, बाबुराव म्हेत्रे, गणेश नारायणकर, स्वामीराव कुसेकर, धोंडूराज बनसोडे, सिद्रय्या सोड्डे, पिरप्पा कुंभार, यासीन मुजावर, शरणू कोळी, सुनील मोरे, जावेद मानियार, संतोष बिराजदार, स्वामीनाथ आलुरे, सिद्धू महामुनी, खाजाभाई चंदनवाले, देविदास फुलारी चौडप्पा कोळी इत्यादी होते. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक विठ्ठल कटारे, किसन जाधव, राजश्री तांबे, कासीम कोटनाळ, प्रभावती माशाळे, शिक्षकवृंद तसेच या कार्यक्रमाचे आयोजिक शालेय समिती अध्यक्ष रमेश गायकवाड, जगदेवी लोहार आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन निलोफर फणीबंद, कृष्णा शिंदे तर आभार मुख्याध्यापक मंगलदास यरोळे यांनी मानले.

# सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये २० फेब्रुवारीपासून बेमुदत बंद

**सोलापूर** : राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी २० फेब्रुवारीपासून बेमुदत बंद आंदोलन करतील, अशी माहिती अखिल भारतीय विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष डॉ. आर. बी. सिंह यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालय सेवक संयुक्त कृती समितीच्या वतीने राज्य शासनाकडे प्रलंबित ६ मागण्यासाठी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे २ फेब्रुवारीपासून बारावी बोर्ड व विद्यापीठ परीक्षावरील बहिष्कार आंदोलन सुरू आहे. त्यानिमित्त कृती समितीचे पदाधिकारी दौऱ्यावर आहेत. ते सोलापुरात पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, विद्यार्थ्यांचे हित पाहून आम्ही दोन वेळा हा संप स्थगित केला आहे. परंतु या बैठकीत ठोस निर्णय न झाल्यामुळे आम्ही हा संप पुढे चालू ठेवला आहे. या पत्रकार परिषदेस कृती समितीचे संघटक राजा बढे, राजेंद्र गोटे, गोविंद जोशी, माधव राऊळ, अनिल लब्रे, दिलीप पवार, सोमनाथ सोनकांबळे, अजितकुमार संगवे, सुनील थोरात, रविकांत हुक्किरे, दत्ता भोसले, राजेंद्र गिड्डे, राहुल कराडे, आनंद व्हटकर, हणमंत खपाले आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर संस्कारही शिकणे आवश्यक : खरात

**कै. ब्रह्मदेवदादा माने यांच्या जयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धेचे आयोजन**

## विविध शाखेतील दीड हजार विद्यार्थ्यांचा सहभाग




**सोलापूर** : आजच्या जगात माणूस काय शिकला यापेक्षा तो समाजात कसा वावरतो कसा वागतो हे महत्त्वाचे आहे त्यामुळे मुलांनी शिक्षणाबरोबर संस्कारही शिकावे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तिचा आदर करावा असे प्रतिपादन प्रसिद्ध युवा चित्रकार तथा पालिकेचे ब्रँड अँबेसिडर सचिन खरात यांनी केले.

कै.मा. आमदार ब्रह्मदेव दादा माने यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त तसेच एसपीएम पॉलिटेक्निकलच्या रौप्य वर्षानिमित्त शिक्षण प्रसारक मंडळ कुमठे येथे संस्थेअंतर्गत भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सचिन खरात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रह्मदेव दादा माने बँकेचे चेअरमन चंद्रकांत लिंबीतोटे होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे मुख्य विश्वस्त तथा माजी नगरसेवक जयकुमार माने, संस्थेचे प्रमुख विश्वस्त बाळासाहेब माने, स्वातीताई माने, ब्रह्मदीप संस्थेचे अध्यक्ष अजित माने आदींची उपस्थिती होती. सुरुवातीला दीपप्रज्वलन झाल्यानंतर हवेत फुगे सोडून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी सचिन खरात यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात चित्रकला स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अभिनंदन केले आणि यापुढे राज्यस्तरीय स्पर्धा घ्यावी, अशी इच्छा व्यक्त केली. यावेळी माजी नगरसेवक जयकुमार माने म्हणाले की, कै. दादांनी सुरुवातीपासूनच शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार केला यातूनच त्यांनी अनेक संस्था उभा केल्या, यातून अनेक विद्यार्थी घडले.दादांनी पारंपरिक शिक्षणाबरोबरच तंत्रज्ञानाचीही आवश्यकता आहे हे ओळखून २५ वर्षांपूर्वी पॉलिटेक्निकलची स्थापना केली. आज त्याचा रौप्य महोत्सव साजरा होत आहे याचा आनंद आहे.

या भव्य आणि दिव्य चित्रकला स्पर्धेत संस्थेतील विविध शाखांमधून जवळपास दीड हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला गुरुसिद्ध कस्तुरे, तानाजी शिनगारे, रसूल शेख, सुभाष अवताडे, राजू मायनळे, दिनेश बिराजदार, एसपीएमच्या प्राचार्य रोहिणी चव्हाण, मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड, प्रा. प्रकाश काशीद, प्रा.मलकारी मलकारी कोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# विजय श्री राज्यस्तरीय बॉडी बिल्डिंग स्पर्धेचे गुरुवारी आयोजन

**सोलापूर** : ॲक्टिव्ह ८ जिम, शशिकांत अक्कलवाडी मित्र परिवार यांच्या वतीने महाराष्ट्र बॉडीबिल्डिंग असोसिएशन यांच्या मान्यतेने, सोलापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग व फिटनेस फेडरेशन यांच्या सहकार्याने गुरुवार दि. १६ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय विजय श्री बॉडी बिल्डिंग व मेन्स फिजिक स्पर्धा आयोजित केली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील खेळाडूंसाठी विजय सोलापूर श्री या स्पर्धेचेही आयोजन केले आहे, अशी माहिती फेडरेशनचे अध्यक्ष संतोष पवार व सरचिटणीस विशाल गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोलापूर येथील विजापूर रोड वरील ॲक्टिव्ह ८ च्या समोरील ग्राऊंडवर गुरूवार दि. १६ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.३० वाजता स्पर्धा सुरू होणार आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धकासह राज्यतील अनेक दिग्गज बॉडी बिल्डर या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

विजय श्री राज्यस्तरीय स्पर्धेतील विजेत्याला ५१ हजार रुपये व चांदीची गदा, उपविजेत्याला ३१ हजार रुपये तर तिसरा क्रमांक प्राप्त विजेत्यास २१ हजार रुपये बक्षीस दिले जाणार आहेत. बेस्ट पोझर व बेस्ट इम्पृव बॉडी बिल्डर साठी ५ हजार रुपये दिले जाणार आहेत. ही स्पर्धा ८ वजनी गटात होणार आहे. ५५ ते ८५ वरील गटात असून अनुक्रमे विजेत्याना रु. ७ हजार , ५ हजार, ४ हजार, ३ हजार, २ हजार व सन्मानचिन्ह दिले जाणार आहेत. मेन्स फिजिक ही स्पर्धा १७० सेमी आतील व १७० सेमी वरील उंची अश्या दोन गटात घेतली जाणार आहे. विजेत्याना अनुक्रमे ७ हजार ५ हजार, ४ हजार, ३ हजार २ हजार रु व सन्मानचिन्ह असे पारितोषिक दिले जाणार आहे. विजय सोलापूर श्री स्पर्धेसाठी अनुक्रमे ४ हजार रुपये, ३ हजार, २ हजार, १ हजार रुपये तर ६ ते १० विजेत्याना ही प्रत्येकी १ हजार व सन्मानचिन्ह दिले जाणार आहे. भव्य दिव्य व शिस्तबद्ध नियोजनाने ही स्पर्धा संपन्न होणार आहे. या स्पर्धेचा लाभ युवा व क्रीडा प्रेमींनी घ्यावा असे आवाहन संयोजक शशिकांत अक्कलवाडी यांनी केले आहे.



# गायकवाड खून प्रकरण : १६ जणांची निर्दोष मुक्तता

**सोलापूर** : कुर्डूवाडी येथील टोल नाक्याजवळ पूर्ववैमनस्यातून विकी विष्णू गायकवाड याचा तलवार, कोयता आणि रॉडने मारून खून केल्याच्या आरोपावरून माणिक श्रीरामे यांच्यासह १६ जणांविरुद्ध भरण्यात आलेल्या खटल्याची सुनावणी बार्शी येथील सत्र न्यायालयात होऊन सर्व आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली. विकी गायकवाड व आरोपींमध्ये पूर्वी झालेल्या भांडणामुळे वैमनस्य होते. १७ जून २०१८ रोजी दुपारी विकी गायकवाड हे कारमधून बार्शी कुर्डूवाडी बायपास रोडवरून सोलापूरकडे निघाले होते. टोल नाक्याजवळ आरोपींनी त्याच्यावर हल्ला करून त्याचा खून केल्याच्या आरोपावरून माणिक श्रीरामे, आकाश राजगे, विनोद सोनवणे, अनंतराव सोनवणे, आकाश श्रीरामे, अर्जुन श्रीरामे, अक्रम खान, विशाल शिंदे, करण वाल्मिकी, सागर कापुरे, किशोर ढवळे, महादेव गायकवाड, राहुल बनसोडे, बाळू गायकवाड, राजेश उबाळे, फारुख खान अशा १६ जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल करून न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. माढा तालुक्यात गाजलेल्या या खटल्यात आरोपी क्रमांक १ ते ७ तर्फे ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड. विकास मोटे, ॲड. शरद झालटे तर आरोपी क्रमांक ८ ते १६ तर्फे ॲड. महेश जगताप (बार्शी) यांनी काम पाहिले.

# सवतगव्हाण जि. प. शाळेतील मुख्याध्यापकाचे कार्यालय फोडले

**अकलूज** : शाळेला सुट्टी असल्याचे पाहून चोरट्याने शाळेतील मुख्याध्यापकाचे कार्यालय फोडले आणि १२ खुर्च्या, संगणक, ऑटो फिल्टर मशीन, पेन ड्राईव्ह आणि छतावरील २ पंखे असा एकूण १७ हजार ३०० रुपयाचा माल पळविला. ही घटना सवतगव्हाण (ता. माळशिरस) येथील जिल्हा परिषद शाळेत घडली. यासंदर्भात शाळेचे मुख्याध्यापक सुनील दत्तात्रय शिंदे यांनी अकलूज पोलिसात तक्रार दाखल केली. ४ ते ६ फेब्रुवारी दरम्यान शाळेला सुट्टी होती. ही संधी पाहून चोरट्याने आपल्या कार्यालयाचे कुलूप तोडले आणि वरील माल चोरून नेला. शिवाय कार्यालयातील कागदपत्रे अस्ताव्यस्त करून नुकसान केले. असे त्यांच्या फिर्यादीने नमूद केले आहे. हवालदार घाडगे पुढील तपास करीत आहेत .

# हातातील मोबाईल हिसकावला



**सोलापूर** : प्रीती शिंदे व त्यांची आई हॉस्पिटलमधून त्यांच्या दुचाकी क्रमांक एम. एच.१३. बीएम.२७४७ यावरून घरी परत येत असताना त्यांच्या पाठीमागून आलेल्या एका अज्ञात मोटरसायकल वरील इसमाने प्रिती शिंदे यांचा मोबाईल हिसकावला आहे. ही घटना दि. ६ फेब्रुवारी रोजी रात्री सव्वाआठच्या सुमारास माशाळ वस्ती ते राजस्व नगर रस्त्यावर घडली. याप्रकरणी प्रीती प्रेमनाथ शिंदे (रा. राजेश्वर नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार म्हेत्रे हे करीत आहेत.

# वलादत मौलाअलीनिमित्त महाप्रसादाचे वाटप

**सोलापूर** : जश्न-ए-विलादत मौलाअली दरवर्षीप्रमाणे यंदाही महाप्रसादाचे वाटप व प्रवचन कार्यक्रम पेंटर चौक, शनिवार पेठ येथे घेण्यात आले. सदर हिंदू-मुस्लीम बांधवांनी हे कार्यक्रम पार पाडले. तसेच यावेळी उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यक्रमाचे मुख्य सय्यद अब्दुल सलाम साबरी अलीखेड (हुमनाबादवाले) यांचे प्रवचन झाले व त्यांच्या हस्ते पूजा व (फातेहखानी) करण्यात आली. यावेळी मोहरम कमिटी शहर सोलापूरचे अध्यक्ष हाजी मकबूल मोहोळकर उपस्थित होते. या कार्यक्रमास सफल करण्यासाठी उपस्थित पदाधिकारी मुजावर हाजी युसुफ शेटे, अध्यक्ष अ. रशीद शेटे, उपाध्यक्ष मोहसीन बिल्लेवाले, खजिनदार फयाज टिनवाले, सेक्रेटरी फारुक शेटे, सचिव इमरान शेटे, सदस्य राजेंद्र हुणकेरी, गोपी खडके, मोहन चकोले व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा प्रवासी संघातर्फे 'वंदे भारत'चे स्वागत

## भाजपकडून जय श्रीरामच्या घोषणा

सुराज्य/बार्शी

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी 'वंदे भारत एक्सप्रेस'चे स्वागत कुर्डूवाडी रेल्वेस्थानकावर सोलापूर जिल्हा प्रवासी संघाच्यावतीने जल्लोषात करण्यात आले. यावेळी अध्यक्ष हर्षद मोरे, खा. जयसिध्देश्वर स्वामी, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, समाजकल्याण माजी सभापती शिवाजी कांबळे यांच्यासह रेल्वेचे सर्व अधिकारी उपस्थित होते. यावेळी कुर्डूवाडीकरांनी दाखवलेली उपस्थिती लक्षवेधी होती. कुर्डूवाडीच्या इतिहासामध्ये एखाद्या रेल्वेच्या स्वागताला पहिल्यांदाच हजारोंच्या संख्येने प्रचंड गर्दी कुर्डूवाडीकरांना पाहायला मिळाली.**




सोलापूर जिल्हा प्रवासी संघ, भारतीय जनता पार्टी, वंचित बहुजन पार्टी या सर्वच पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व रेल्वेच्या विविध कर्मचाऱ्यांच्या संघटना या स्वागतामध्ये सामील झाल्या होत्या.

'वंदे भारत रेल्वे'ची माहिती देणारी स्क्रीन रेल्वे स्थानकावर मध्य रेल्वेच्यावतीने लावण्यात आली होती.

रेल्वेस्थानकावर नरेंद्र मोदी यांच्या फोटोसह मध्य रेल्वेची जाहिरात देखील मोठ्या प्रमाणात करण्यात आली होती. प्रांताधिकारी ज्योती कदम, तहसीलदार राजेश चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रांतजी बोधे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गोविंद कुलकर्णी, नगरसेवक चंद्रकांत वाघमारे, भाजपाचे कुर्डूवाडी अध्यक्ष शंकर बागल, साम्राज्य आरमारचे उमेश पाटील, प्रवीण सोमासे, हरीश भराटे आदी उपस्थित होते.

### जिल्हा प्रवासी संघामुळे कुर्डूवाडी येथे थांबा मिळाला

जिल्हा प्रवासी संघाच्यावतीने आम्ही मध्य रेल्वेकडे गेल्या अनेक दिवसापासून 'वंदे भारत' या नवीन एक्सप्रेसला कुर्डूवाडी रेल्वेस्थानकात थांबा मिळावा म्हणून प्रयत्नशील होतो आणि आज भारताच्या इतिहासातील 'वंदे भारत एक्सप्रेस' ही गाडी नव्या युगाचा प्रारंभ व नवे पर्व ठरणार आहे. कुर्डूवाडी-सोलापूर अशा स्थानकात ही गाडी थांबणार असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला हातभार लागणार आहे, असे हर्षद मोरे यांनी सांगितले.

### 'जय श्रीराम, भारत माता की जय'च्या घोषणा

'वंदे मातरम्' ही रेल्वे रेल्वे स्थानकात आल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी 'जय श्रीराम'च्या घोषणाबाजी चालू केली असता दुसरीकडे जिल्हा प्रवासी संघाने 'भारत माता की जय, वंदे मातरम्' या घोषणांनी दिल्या. यावेळी कुर्डूवाडी स्थानक गजबजून गेले होते.

# माढा नगरपंचायतीच्या पाठपुराव्यास यश

- विविध विकास कामांसाठी ३ कोटींचा निधी मंजूर : ॲड. साठे
- केंद्रशासनाच्या अमृत २.० योजनेसाठी नगरपंचायतीचा प्रस्ताव सादर

सुराज्य/माढा

**माढा नगरपंचायतीच्यावतीने केलेल्या पाठपुराव्यास यश आले असून नुकताच विविध विकासकामांसाठी २ कोटी ९४ लाख १५ हजार रुपयांचा निधी प्राप्त झाल्याची माहिती नगराध्यक्षा ॲड. मिनलताई साठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत वॉर्ड क्रमांक ५,१६ व १७ मध्ये पाणीपुरवठा व रस्ते इनलाईन गटार यासाठी १ कोटी ५४ लाख, वार्ड क्रमांक ३ व ४ मध्ये दलितेतर योजने अंतर्गत विकासासाठी ५२ लाख ६५ हजार आणि अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्तीसुधार योजनेअंतर्गत ८७ लाख ५० हजार रुपयांचा निधी रस्ते इनलाईन आणि पेव्हींग ब्लॉकसाठी मंजूर झाल्याचे नगराध्यक्षा साठे यांनी सांगितले.



शहराच्या सुधारित पाणीपुरवठा योजनेसाठी केंद्र शासनाच्या अमृत २.० या योजनेद्वारे निधीसाठी ७३ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला असून या माध्यमातून शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता फिल्टर हाऊस पाण्याच्या टाक्या आणि संपूर्ण शहरातील अंतर्गत पाईप लाईनसह अत्याधुनिक अशी पाणीपुरवठा योजना नियोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. याचबरोबर विविध विकास कामांसाठी आणखी ३ कोटी रुपयांचे प्रस्ताव आणि विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून शॉपींग कॉम्पलेक्स साठी ४ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केलेला असून त्याचाही पाठपुरावा सुरू असून लवकरच त्यास मंजुरी मिळणार असल्याचे सांगण्यात आले. नियोजित माढा शहराच्या प्रारूप विकास आराखड्यावरती विविध हरकती आल्या होत्या. त्यावरती १३ व १४ फेब्रुवारी रोजी सुनावणी होत असून संबंधितांनी आपल्या कागदपत्रासह नगरपंचायत कार्यालयात येण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

या पत्रकार परिषदेस कूर्मदास साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, नगरसेवक अजिनाथ माळी, पाणीपुरवठा सभापती नितीन साठे, आरोग्य सभापती विकास साठे आदी उपस्थित होते.

# अकलूज नगरपरिषदेसाठी दहा कोटींचा निधी

सुराज्य/अकलूज

राज्य शासनाच्या नगरविकास खात्याकडून वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत अकलूज नगर परिषदेसाठी दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी दिली. यासाठी आमदार रणजितसिंह यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता .

आमदार रणजितसिंह मोहिते -पाटील यांनी डिसेंबर २०२२ पासून लेखी निवेदनासह सतत पाठपुरावा केला होता. त्यामुळे अकलूज नगर परिषदेसाठी दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला



असल्याचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले. एका वेळेस एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी मंजूर झाल्याने अकलूज नगर परिषदेतील नागरिकांमधून आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे अभिनंदन केले जात आहे. अकलूज नगरपरिषद हद्दीतील एकूण २७ कामांसाठी हा दहा कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

# सिकई मार्शल आर्ट स्पर्धेत सोहम भांग चॅम्पियन

सुराज्य/चिखली

हरिद्वार (उत्तराखंड) येथे १ ते ३ फेब्रुवारी दरम्यान झालेल्या २३ व्या राष्ट्रीय सिकई मार्शल आर्ट स्पर्धेमध्ये मोहोळ तालुक्यातील शेटफळचा सोहम भांगे हा चॅम्पियन ऑफ चॅम्पियन ठरला.

या स्पर्धेमध्ये त्याने ४४ किलोखालील वजनी गटामध्ये सुवर्णपदक पटकावले आहे. या स्पर्धा सिकई असोसिएशन - उत्तराखंड, सिकई मार्शल आर्ट फेडरेशन ऑफ इंडिया मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर्स अँन्ड स्पोर्ट्स गव्हरमेंट ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हरिद्वार येथे पार पडल्या.

या स्पर्धेमध्ये २२ राज्यांनी सहभाग नोंदविला होता. उद्‌घाटनप्रसंगी उत्तराखंड राज्याच्या क्रीडा मंत्र्यांची उपस्थित होती. तर समारोपाच्या वेळी उत्तराखंड राज्याचे शिक्षणमंत्री सुबोध यांची उपस्थिती होती. त्यांनी भारताचा चॅम्पियन ऑफ चॅम्पियन ठरल्याबद्दल सोहमचा सन्मान केला व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# करजगी युवा प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठांचा सत्कार

सुराज्य/सोलापूर : ज्येष्ठ उद्योजक व कामगार नेते कुमार करजगी यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार पद्मानगर येथील माऊली मंदिरात उपस्थितीत पार पडला. संस्थेच्यावतीने टोपी, शाल, गुच्छ व मिठाई देऊन सर्व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ नागरिकांच्या सत्कारानंतर त्या सर्व ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते कुमार करजगी यांचा वाढदिवसानिमित्त खेळीमेळीच्या वातावरणात




सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ नागरिकांमध्ये महादेव माने, रामचंद्र माने, भांगडिया शेठजी, काटवे काका वाघमारे, बोल्ली महाराज, आळगुंडगी, महाडिक, सातपुते, म्हेत्रे, कुलकर्णी, पत्की, वेदपाठक, रेळेकर, पांढरे, माळी, राजू उडाणशिव आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक प्रवीण पारवे, युवा उद्योजक यशराज करजगी, प्रवीण शिंदे, ज्योतिबा माने, संतोष ढवण, माजीत सर, आनंद तुपसाखरे, किरण मङ्कर, नाना कसबे, अरविंद शेरखाने, लगशेट्टी, अंबादास तडकोपोमूल, बरसू बिराजदार आणि संस्थेचे सभासद उपस्थित होते.

# बीओएम सांगोला शाखेतर्फे पथविक्रेत्यांना डिजिटल व्यवहाराचे प्रशिक्षण

सुराज्य/सांगोला

**सांगोला येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेच्यावतीने शहरातील ८२ पथविक्रेत्यांना १० हजाराचे खेळते भांडवल ३१ पथविक्रेत्यांना रु. २० हजाराचे खेळते भांडवल तर ०४ पथविक्रेत्यांना ५० हजार रुपयाचे खेळते भांडवल कर्ज पुरवठारूपाने उपलब्ध करून दिले आहे. त्यांना डिजिटल पध्दतीने व्यवहार केल्यास त्यांना कॅशबॅक ऑफर देण्यात आली आहे. याचे प्रशिक्षण त्यांना बँकेच्यावतीने देण्यात आले.**

डॉ. सुधीर गवळी, मुख्याधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कॅशबॅक ऑफरचा लाभ घेण्याकरिता बँक ऑफ महाराष्ट्र व नगरपरिषदेच्या संयुक्त विद्यमाने पथविक्रेत्यांना गुगल पे, फोन पे, भीम ॲप पेटीएम इ. ॲपच्या माध्यमातून कशाप्रकारे डिजिटल व्यवहार केला जातो याचे प्रात्यक्षिक देण्यात आले.

यावेळी सांगोला नगपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक विजयकुमार कन्हेरे व बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक दीपक गवळी यांच्या हस्ते उपस्थित पथविक्रेते यांना क्यूआरकोडचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी दीपक गवळी, व्यवस्थापक यांनी उपस्थित पथविक्रेते यांना डिजिटल पेमेंट व त्याचे फायदे याविषयी माहिती दिली.

यावेळी नगरपरिषदेचे सहा. प्रकल्प अधिकारी योगेश गंगाधरे, बिराप्पा हाके, समुदाय संघटक व बँक ऑफ महाराष्ट्राचे अधिकारी उपस्थित होते.

कोविड १९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता केंद्र व राज्य शासनाने लॉकडाऊन व संचारबंदी जाहीर केल्याने पथविक्रेत्यांचा रोजगार हिरावला. त्यांना उभारी मिळण्याकरिता केंद्रशासन पुरस्कृत पंतप्रधान पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी अंतर्गत १० हजारांचे खेळते भांडवल कर्ज पुरवठारूपाने बँकेकडून देण्यात येत आहे. किरकोळ व्यवसाय पुन्हा सुरु करण्यासाठी खेळते भागभांडवलाचा पतपुरवठा केला जात आहे. राष्ट्रीयीकृत बँकेच्या सहकार्याने ही योजना राबविली जात आहे.

## आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे प्रयत्न

# अक्कलकोटमधील ९ रस्त्यांकरिता ४० कोटी रुपये मंजूर

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट विधानसभा म्हणजे खराब रस्ते व वाहधारकांना त्रासच त्रास हा ठरलेलाच असायचा पण आता केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेतून जाणीवपूर्वक प्रयत्न करून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी यावेळी एकूण ९ रस्त्यांचे मजबूतीकरण व डांबरीकरण यासाठी एकूण ३९ कोटी ३२ लाख ९ हजार एवढी रक्कम मंजूर झाली आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून हा संपूर्ण निधी मिळाल्याने ४५ किलोमीटरच्या खालीलप्रमाणे सर्व ९ रस्त्यास निधी मिळू शकला आहे. यावेळी मंजूर झालेले रस्ते आणि त्यांना मिळालेला निधी पुढीलप्रमाणे आहे. चुंगी ते सुलतानपूर (३.२) किलोमीटरसाठी २ कोटी ३९ लाख ८१ हजार, अक्कलकोट ते हसापूर (३) किलोमीटरसाठी २ कोटी २४ लाख १२ हजार,



अक्कलकोट ते सिंदखेड (८) किलोमीटरसाठी ५ कोटी ९४ लाख २३ हजार, तडवळ ते म्हैसलगी (५) किलोमीटरसाठी ३ कोटी ६४ लाख ५३ हजार, हणमगांव ते वळसंग (५.५) किलोमीटरसाठी ४ कोटी

बोरोटी ते हालहळ्ळी (मैं) (५) किलोमीटरसाठी ३ कोटी ९० लाख ६६ हजार, तडवळ ते आळगी (९) किलोमीटर साठी १० कोटी ७६ लाख ५४ हजार, ६७ लाख ४७ हजार, कासेगांव ते धोत्री (३.५) किलोमीटरसाठी २ कोटी ९० लाख ८ हजार तसेच आचेगाव ते हंजगी (३) किलोमीटरसाठी २ कोटी ८४ लाख ६७ हजार असा एकूण ३९ कोटी ३२ लाख ९ हजार एवढा निधी मंजूर झाला आहे. हे सर्व रस्ते आता पूर्ण होऊन मार्ग नवीन डांबरीकरण पूर्ण झाल्यास दळणवळणं सुविधा चांगली होण्यास मदत होणार आहे.

### रस्त्यामुळे दळणवळण सुविधा चांगली होणार : कल्याणशेट्टी

अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण भागातील गरज असलेले अनेक रस्ते आता मंजूर झाले आहेत आणि होत आहेत. कोट्यवधींच्या विकास निधींने पूर्ण होऊन शेती व इतर दळणवळण सुविधेसाठी सज्ज होत आहेत. यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे मिळत असलेले सहकार्य मोलाचे आहे., असे आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी म्हटले आहे.

सुराज्य सोलापूर Classified

**नोकरी विषयक**

शेतात वस्तीवर राहून नर्सरी व गायींचे काम करणारे जोडपे पाहिजे. पगार १७००० महिना. दोन लाख वर्षाला. ९९२२००४२४२ गिरमे अकलूज.(१३०३२३)

**विवाह विषयक**

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : **9763624364, 7410553871** (030323)

# वर्गणीच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर** : जुना विडी घरकुल येथील शिंदे शाळेजवळील धनश्री बुक डेपोमध्ये आनंद सुदर्शन अंकम (वय-२९, रा. नेताजी नगर, जोडभावी पेठ) हे दुकानात बसले होते. शिवशक्ति प्रतिष्ठान मंडळाच्या दहा ते पंधरा कार्यकर्त्यांपैकी संजू भोसले व दोन अनोळखी इसमांनी शिवजयंतीनिमित्त १ हजार रुपये व ५०० रुपयाची मागणी केली. अंकम यांनी देण्यास मनाई केली असता त्यांना मारहाण करुन दुकानातील काउंटरची काच तोडून नुकसान केले आहे.

याप्रकरणी फिर्यादी आनंद अंकम यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

# राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत पुणे विभागाचे वर्चस्व

सुराज्य/अकलूज

क्रीडा व सेवा युवक संचालन महाराष्ट्राची पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय सोलापूर जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर व सोलापूर जिल्हा धनुर्विद्या संघटनेच्या संयुक्त विद्यमाने १७ वर्षाखालील राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धा २०२२-२०२३ अकलूज येथील विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल या ठिकाणी पार पडली. यामध्ये राज्यातील ९ विभाग सहभागी झाले होते. स्पर्धेचे उदघाटन व बक्षीस वितरण स्वरुपाराणी मोहिते-पाटील, जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष भारत शिंदे, क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, जिल्हा सचिव हरिदास रणदिवे यांच्या हस्ते करण्यात आले.

कंपाऊंड राऊंड प्रकारच्या स्पर्धा निकाल पुढीलप्रमाणे: मुले ओव्हरऑल निकाल ओम कांबळे-पुणे, प्रथम, अथर्व कांबळे कोल्हापूर द्वितीय, कपिल सातघरे-मुंबई तृतीय. मुली ओव्हर ऑल निकाल- आर्या प्रसाद-पुणे प्रथम, ऋतुजा कसाळ-पुणे द्वितीय, अनुष्का मदने- पुणे तृतीय, इंडियन राऊंड प्रकार मुले ओव्हर ऑल निकाल.

आदित्य चव्हाण, पुणे प्रथम क्रमांक, स्वराज राजेंद्र जंगम, कोल्हापूर द्वितीय क्रमांक, अनिकेत गावडे, कोल्हापूर, तृतीय क्रमांक. मुली ओव्हर ऑल निकाल ऋतुजा पवार - नाशिक, प्रथम क्रमांक. समृध्दी पवार - पुणे ,द्वितीय क्रमांक. संचिता नाईक - कोल्हापूर, तृतीय क्रमांक.

रिकर्व्ह राऊंड प्रकारच्या स्पर्धा निकाल पुढील प्रमाणे: मुले ओव्हर ऑल निकाल यश उगले - अमरावती, प्रथम क्रमांक. सोहम कणसे - पुणे, द्वितीय क्रमांक. अथर्व कदम-पुणे, तृतीय क्रमांक. मुली ओव्हर ऑल निकाल- वैष्णवी पवार -पुणे, प्रथम क्रमांक. सिद्धी साळुंखे - पुणे , द्वितीय क्रमांक, सायमा शेख - पुणे ,तृतीय क्रमांक

या वेळेस भारत शिंदे, हरिदास रणदिवे, डॉ. विश्वनाथ आवड, धर्मराज दगडे, सुप्रिया किरनाळे, सोनल बुंदीले, क्रीडा अधिकारी तानाजी मोरे, सुप्रिया गाढवे, धारूरकर, भैरावनाथ नायकुडे आदी मान्यवर उपस्थित होते.




### आंतरराष्ट्रीय पातळीवरील धनुर्विद्येचे खेळाडू घडवू : धैर्यशील

ग्रामीण भागातील मुलांमध्ये देखील गुणवत्ता सिद्ध करण्याची क्षमता असते त्यांना फक्त गुणवत्तापूर्ण योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षणाची गरज असते, हे लक्षात घेता त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरचे प्रशिक्षण उपलब्ध करून देऊ व सोलापूर जिल्ह्यातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील धनुर्विद्येचे खेळाडू घडवू, असे सोलापूर जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे अध्यख धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले.

## पत्रकार शशिकांत वारीशे प्रकरण

# एसआयटी चौकशीचे फडणवीसांचे आदेश



✔ सुराज्य/मुंबई

रत्नागिरीत पत्रकार शशिकांत वारीशे यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरण तापलं आहे. ठाकरे गटाच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी वारीशे प्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वे सर्वा शरद पवार यांनीही या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारवर गंभीर टीका केली आहे. वारीशे प्रकरणावरून विरोधकांकडून होत असलेल्या आरोप आणि टीकेनंतर राज्य सरकारने मोठं पाऊल उचललं आहे. आता या प्रकरणी एसआयटी चौकशी होणार आहे.

पत्रकार शशिकांत वारीशे प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी नेमण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस प्रशासनाला दिले आहेत. वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेत ही एसआयटी स्थापन करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस प्रशासनाला दिले आहेत.

### काय म्हणाले शरद पवार?

एका आठवड्यात तिथे पाच-सात असे गुन्हे घडले, असं एका वर्तमानपत्रात वाचण्यात आलं. हे काही चांगलं लक्षण नाही. महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था नेहमी चांगली असते. पण हल्ली त्याच्यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी ज्यांची आहे, ते कितपत लक्ष देतात यासंबंधीच्या शंका निर्माण व्हायला लागल्या आहेत. त्या संबंधीचं वृत्त छापून आलं आहे. आता पत्रकारांची सुद्धा ही अवस्था झाली, तर याचा अर्थ काय, राज्य कोणत्या दिशेने चाललंय हे आता समजून घ्यावं लागेल, असं म्हणत शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली आहे. दररोज काहिना काहीतरी नवीन समोर येतंय. हल्ला आणि हत्या या प्रकारच्या बातम्या येत आहेत. किंवा रस्त्यावरचे अपघात, या दोन गोष्टी महाराष्ट्रात वाढल्या आहेत. ही चिंताजनक बाब आहे, असं शरद पवार म्हणाले.

### काय म्हणाले विनायक राऊत?

दरम्यान, ठाकरे गटाचे खासदार विनायक राऊत यांनी वारीशे कुटुंबीयांची भेट घेतली आणि त्यांनी कुटुंबीयांचं सांत्वन केलं. न्यायासाठी झगडणारा आणि अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या पत्रकार वारीशे यांची हत्या करण्यात आली आहे. भूमाफियांनी त्यांची हत्या केली आहे. याचा आम्ही धिक्कार आणि निषेध करतो.



### वारीशे प्रकरणावरून मंत्री गिरीश महाजन यांचे राऊतांना प्रत्युत्तर

संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. वारीशे प्रकरणात आरोपीला राजाश्रय दिला जातोय, असे ते म्हणतात. पण कालच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फास्ट ट्रकवर प्रकरण हाताळणार असल्याचे म्हटले आहे. राऊत हे प्रसिद्धीसाठी बोलत आहेत. त्यांच्या सरकारच्या काळात पत्रकारांचे हाल झालेत. राजाश्रय दिला असता तर आरोपीला पकडले नसते. राऊत रोज भोंगा वाजवत आहेत. दिवसाढवळ्या कोणी कायदा सुव्यवस्था मोडत असेल तर त्याला शिक्षा होणारच. देवेंद्र फडणवीस यांनी नाणार प्रकल्पबाबत बोलावे आणि हत्या व्हावी याचा काहीही सबंध नाही. राऊत यांनी त्यांच्या काळात काय झाले ते आठवावं, असं प्रत्युत्तर मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिकमध्ये दिलं.

---

## पालकांची चिंता वाढली

# कोरोनानंतर मुलांच्या विकासात अडचणी

✔ सुराज्य/मुंबई

कोरोना संसर्ग संपला तरीही मुलांमध्ये भावनिक तसेच मानसिक पातळीवर निर्माण झालेल्या वर्तवणूक समस्या अद्याप सुटलेल्या नाहीत. अनेक मुलांमध्ये संवादकौशल्ये, वागणुकीमध्ये बदल तसेच विकासाच्या टप्प्यांमध्ये अनेक पातळ्यांवर अडचणी येत असल्याचे दिसून आले आहे. लहान मुलांमध्ये ज्याप्रकारे बौद्धिक विकास होणे गरजेचे होते, तसा न झाल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण असल्याचे बालरोगतज्ज्ञांनी सांगितले आहे.



'न्यू होरायझन्स चाइल्ड डेव्हलपमेंट सेंटर'च्या विसाव्या स्थापनादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमातून किशोरवयीन मुलांमध्ये असलेल्या विकासात्मक विकारांबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या केंद्राद्वारे आतापर्यंत १५ हजारांहून अधिक मुलांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. या कार्यक्रमात प्रख्यात डॉक्टर, शिक्षणतज्ज्ञ, नागरी समाजाचे सदस्य आणि हितचिंतकांसह सुमारे ५०० मुले आणि पालकांनी सहभाग घेतला. तर व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे खासदार सुप्रिया सुळे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

## काँग्रेस-माकपकडून त्रिपुराच्या विकासात खोडा

✔ त्रिपुरा : त्रिपुरामध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आपला विजय व्हावा यासाठी सगळेच पक्ष तयारीला लागेल आहे. अशात भाजपाही मागे कसा हटणार? पंतप्रधान नरेंद्र मोदी हे प्रचारासाठी त्रिपुरामध्ये आले आहेत. त्रिपुरातल्या अंबासामध्ये त्यांनी रॅलीला संबोधित केलं. भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कम्युनिस्ट आणि काँग्रेस यांच्यावर कडाडून टीका केली.

## अमूल, गोवर्धन पाठोपाठ गोकुळच्या दूध दरातही वाढ

✔ सुराज्य/मुंबई : सर्वसामान्यांचे महिन्याचे बजेच कोलमडणार असल्याची चिन्हे आहेत. अमूल आणि गोवर्धनने दुधाचे दर वाढवल्यानंतर आतो गोकुळनेही दुधाच्या भावात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. गोकुळने शुक्रवारी एक लीटर दुधासाठी २-४ रुपयांपर्यंत वाढ केली आहे. गोकुळचे फुल क्रीम मिल्कची किंमत यापूर्वी ६९ होती ती वाता तीन रुपयांनी वाढवून ७२ इतकी करण्यात आली आहे.

अमूल डेअरीनेही महिन्याच्या सुरुवातीलाच दुधाच्या दरात तीन रुपयांनी वाढ केली होती. त्यानंतर गोवर्धननेही २ रुपयांनी वाढ केली होती. ऑपरेशन आणि मिल्क प्रोडक्शन कॉस्टमध्ये वाढ झाल्याने दुधाच्या किंमतीत वाढ केल्याचं गोवर्धन कंपनीने म्हटलं होतं.

अर्धा लीटरच्या दोन दूध पिशव्यांची किंमत आधी ७० रुपये होती. मात्र, दर वाढवल्यानंतर ती ७२ रुपये इतकी असेल. ग्राहक मोठ्या प्रमाणात वापरत असलेल्या पाच लीटरच्या पॅकेजच्या किंमत ३६० रुपये इतकी असेल. गोकुळने गायींच्या दुधाचे दर ५४ वरुन ५६ रुपये केले आहेत. तर टोन्ड दूध ५२ रुपयांवरुन ५४ रुपयांवर पोहोचले आहे. तर स्पेशल दुधाची किंमतीत चार रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

# इंदापुरात सापडले सत्तर लाखांचे घबाड

### संशयास्पद कारची झडती घेताच पोलीसही चक्रावले

✔ सुराज्य/नाशिक : पुणे-सोलापूर महामार्गावर पोलिसांनी केलेल्या कारवाईत २४० किलो गांजासह दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, एकूण ७० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई सरडेवाडी टोल नाका येथे गुरुवारी रात्रीच्या सुमारास करण्यात आली. विशाखापट्टणम येथून आणलेला गांजा विक्रीसाठी पुण्याकडे नेण्यात येत होता.

रूपेश दिलीप जाधव (रा. वृंदावन पार्क, कसबा, ता. बारामती) आणि सुनील तुळशीदास वेदपाठक (रा. वागज रस्ता, देवळे पार्क, बारामती) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.



याबाबत अतिरिक्त पोलीस अधीक्षक आनंद भोईटे, पोनि दिलीप पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, एका कारमध्ये गांजा घेऊन जात असल्याची माहिती इंदापूर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोनि दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक प्रकाश पवार, पोना सलमान खान, लक्ष्मण सुर्यवंशी, दिनेश चोरमले, सिद्धाराम गुरव, विनोद काळे आदींच्या पथकाने सरडेवाडी टोल नाका येथे सापळा रचला.

सोलापूरकडून पुण्याच्या दिशेने जात असलेल्या संशयित कारला पोलिसांनी थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांना पाहून आरोपींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग करून त्यांना पकडले. कारची तपासणी केली असता १२० पॅकेट्समध्ये ६० लाख रु. २४० किलो गांजा आढळून आला. गांजा आणि कारसह ७० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## टोपेंच्या विधानामुळे कार्यकर्ते बुचकळ्यात

✔ सुराज्य/मुंबई:राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार औरंगाबाद दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान पैठणमध्ये शेतकरी मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी अजित पवार यांच्यासोबत राज्याचे माजी आरोग्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेश टोपे यांच्यासह रा. काँ. चे अनेक महत्त्वाचे नेते उपस्थित होते. यावेळी राजेश टोपे यांनी केलेल्या भाषणात असं काही विधान केलं की, कार्यकर्ते ही बुचकळ्यात पडले आहेत. राजेश टोपेंनी भाषणाच्या सुरुवातीलाच राष्ट्रवादी पक्ष म्हणजे 'एकनाथां'च्या विचाराने चालणारी पार्टी असं विधान केलं, या विधानामुळे उपस्थित कार्यकर्ते आणि नेत्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

# भाजपचे नाशिकमधील प्रकल्प डब्यात

## मेट्रो निओ, आयटी हब, लॉजिस्टिक पार्क केवळ कागदावरच

✔ सुराज्य/नाशिक

केंद्र व राज्यात सत्ता असूनही महापालिकेतील भाजपच्या गत सत्ताकाळात मंजूर करण्यात आलेले मेट्रो निओ, आयटी हब, लॉजिस्टिक पार्क, टीपी स्कीम, प्रोजेक्ट गोदासह अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रशासकीय राजवटीत डब्यात गेले आहेत. पालिकेतील भाजपची सत्ता संपुष्टात आल्यानंतर प्रकल्प गुंडाळले गेल्याने आगामी निवडणुकांना सामोरे कसे जायचे, असा प्रश्न स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित करीत आहेत. गेल्या पाच वर्षांत दत्तक नाशिकची शासनदरबारी फारशी दखल न घेतली गेल्याने त्याचे पडसाद राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत उमटण्याची शक्यता आहे.

सन २०१७ च्या महापालिका निवडणुकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक दत्तक घेण्याची घोषणा केल्यानंतर नाशिककरांनी भाजपच्या पारड्यात पालिकेची सत्ता टाकली. शहर विकासाच्या आश्वासनाला भुलून नाशिककरांनी भाजपला एकहाती सत्ता दिली. मात्र, गेल्या पाच वर्षांत नाशिककरांची उपेक्षाच झाली आहे.



## महिंद्राने लाँच केली जगातील सर्वात वेगवान कार

✔ तेलंगण : तेलंगणामध्ये ई-मोटर शो सुरु आहे. त्यामध्ये तेलंगणा सरकारने या शो मध्ये भारतामध्ये पहिल्यांदाच जगातील सर्वात वेगवान कारचे लॉन्चिंग केले आहे. ई-मोबिलिटी विकचा एक भाग म्हणून या सर्वात वेगवान कारचे लॉन्चिंग करण्यात आले आहे.

## 'जिहादी वधू'वरील माहितीपटावरून बीबीसी पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

✔ सुराज्य/नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल वादग्रस्त माहितीपट बनवणारी बीबीसी आता नव्या वादात अडकली आहे.

बीबीसीने 'जिहादी वधू'वर डॉक्युमेंट्री बनवली आहे. या माहितीपटाचे नाव 'द शमीमा बेगम स्टोरी' असे ठेवण्यात आले असून याबाबत ब्रिटनमध्ये मोठ्या प्रमाणावर विरोध सुरू झाला आहे.

तेथील नागरिक बीबीसीचे सब्सक्रिप्शनचे नूतनीकरण न करण्याचा विचार करीत आहेत.

ब्रिटनमध्ये राहणारी शमीमा बेगम नावाची १५ वर्षीय तरुणी २०१५मध्ये सीरियाला पळून गेली होती. येथे ती इस्लामिक स्टेटमध्ये सामील झाली होती.

तिच्यासमवेत कदिजा सुल्ताना आणि अमीरा अबासे या दोन मैत्रिणीसुद्धा होत्या. तिकडे तिघींनीही आयएसच्या दहशतवाद्यांशी लग्न केले. त्यानंतर 'जिहादी दुल्हन' अशी तिची ओळख बनली. शमीमाचे आई-वडील हे मूळचे बांगलादेशी आहेत.



# १५ लाखांचा गुटखा पाच ठिकाणी जप्त

✔ सुराज्य/उस्मानाबाद

उस्मानाबादेत पोलिसांनी ५ ठिकाणी कारवाई करत तब्बल १५ लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे ५ ठिकाण्यांवर धाड टाकली तिथे पोलिसांना मोठ्या प्रमाणात सुगंधी गुटखा आढळून आला. याप्रकरणी पोलिसांनी ८ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी जिल्ह्यात अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांविरुध्द मोहिम हाती घेतली आहे. धाड टाकताच पोलीस प्रशासनाच्या हाती इतक्या मोठ्या प्रमाणात गुटखा लागल्याने ते देखील चकित झाले आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्यात अवैध धंद्यांची किंवा महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा विक्री करणाऱ्या इसमांची माहिती काढून कारवाई करण्याचे काम सुरु आहे.

उस्मानाबाद येथे महाराष्ट्रात प्रतिबंधीत असलेला गुटखा विक्री करणाऱ्या इसमांची खात्रीशीर बातमी मिळाल्याने सहायक पोलीस अधिक्षक एम. रमेश उपविभाग कळंब यांना ही माहिती दिली. पोलीस उपनिरीक्षक जी. पी. पुजरवाड आणि पोलीस पथकासह उस्मानाबाद शहरातील ५ ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.

# भारताचा ऑस्ट्रेलियावर विजय

✔ सुराज्य/नागपूर

**भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्धची पहिली कसोटी जिंकली आहे. नागपूर येथे झालेल्या सामन्यात भारताने १ डाव आणि १३२ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजीकरत ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात १७७ धावा केल्या होत्या. उत्तरादाखल भारताने ४०० धावांचा डोंगर उभा केला. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव फक्त ९१ धावांवर संपुष्टात आला. भारताच्या या विजयाचा सर्वात मोठा फायदा संघाला आयसीसी टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतक्त्यात झाला आहे.**

### कसोटीत ५ गडी बाद करत आर. अश्विनचा मोठा विक्रम

भारताने नागपूर कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियावर एक डाव आणि १३२ धावांनी विजय मिळवला. हा कसोटी सामना जिंकत बॉर्डर गावस्कर करंडक स्पर्धेतल्या ४ सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. विशेष म्हणजे पहिल्या डावांत तीन विकेट्स घेणाऱ्या अश्विनने दुसऱ्या डावांतही कमाल गोलंदाजी करत कांगारुंना गुडघे टेकायला लावले. अश्विनने ५ फलंदाजांना बाद करुन एक मोठा विक्रम केला. आर. अश्विन याने सामन्याच्या पहिल्या डावात १५.५ षटके टाकत कांगारुंच्या ३ फलंदाजांना तंबूत पाठवले. तसेच दुसऱ्या डावात अश्विनने आक्रमक गोलंदाजी करत ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांना धावसंख्या करू दिले नाही. ऑस्ट्रेलियाच्या सुरुवातीच्या ७ विकेट्सपैकी ५ विकेट्स अश्विन याने घेतल्या. या इनिंगमध्ये अश्विनने ५ बळी टिपून अनिल कुंबळेच्या मोठ्या विक्रमाशी बरोबरी केली. आर. अश्विनने भारतात तब्बल २५ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा जास्त विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे. याआधी केवळ अनिल कुंबळेने भारतात खेळताना २५ डावात ५ किंवा त्यापेक्षा जास्त विकेट घेण्याचा विक्रम केला होता. त्याचवेळी आर. अश्विनने तब्बल ३१ वेळा कसोटीच्या एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक विकेट्स घेतल्या आहेत.

टेस्ट चॅम्पियनशीपच्या दुसऱ्या हंगामात ऑस्ट्रेलियाचा हा फक्त दुसरा पराभव आहे. १६ पैकी त्यांनी १० मध्ये विजय मिळवला आहे तर ४ लढती ड्रॉ झाल्या आहेत. त्यांची विजयाची टक्केवारी ७०.८३ इतकी आहे. गुणतक्त्यात ऑस्ट्रेलिया पहिल्या स्थानावर




आहे. १५ सामन्यातील विजयासह भारताची विजयाची टक्केवारी ६१.६६ इतकी आहे. भारताने १५ पैकी ९ सामन्यात विजय मिळवला आहे.

आयसीसीने यावेळी गुण देण्याची पद्धत थोडी बदलली आहे. यावेळी विजयासाठी १२ गुण, ट्राय झाल्यास ६, ड्रॉ झाल्यास ४ तर पराभवाला काहीच गुण नाही. टक्केवारीचा विचार करता विजयानंतर १०० टक्के, ट्रायसाठी ५० टक्के, ड्रॉ झाल्यास ३३.३३ टक्के मिळतात.

श्रीलंकेचा संघ तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यांना न्यूझीलंडविरुद्ध दोन कसोटी खेळायच्या आहेत. जर त्यांनी या दोन मॅच जिंकल्या नाही तर भारत WTCच्या फायनलमध्ये पोहोचेल आणि फायनल भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होईल.

जर श्रीलंकेने दोन्ही मॅच जिंकल्या तर त्यांची टक्केवारी ६१.११ होईल. अशा परिस्थितीत भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चारही मॅच जिंकाव्या लागतील. अर्थात श्रीलंकेला न्यूझीलंडविरुद्ध दोनही टेस्ट जिंकणे अवघड आहे. जर त्यांनी एक मॅच गमावली किंवा ड्रॉ झाली तर भारत अंतिम फेरीत पोहोचेल.

ऑस्ट्रेलियाचे अंतिम फेरीत पोहोचणे जवळ जवळ पक्के आहे. जर भारताविरुद्धच्या ४ सामन्यात त्यांचा ४-० असा पराभव झाला तर ते गुणतक्त्यात टॉप २ मध्ये राहतील.



# Your's Valentine






१४ फेब्रुवारी अर्थात व्हॅलेंटाईन डे. जागतिक प्रेम दिन. म्हणजेच प्रेम व्यक्त करण्याचा दिवस. प्रेम ही एक आपलेपणाची तरल भावना. एखाद्याविषयी मनात दडलेला आपलेपणा व्यक्त करून त्या व्यक्तीला आपलेसे करणारी भावना म्हणजे प्रेम. प्रेम व्हायला निश्चित अशा एखाद्या दिवसाची गरज नसते. ते कधीही, कुठेही आणि कोणावरही होऊ शकते. पण ते अनेकवेळा व्यक्त करता येत नाही. व्यक्त करायला गेले की अनेक प्रकारचे व्यत्यय येऊ शकतात आणि त्यातून व्यत्यास निर्माण होऊन सत्यानास होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. त्यातून प्रेम व्यक्त करण्यासाठी अशा एखाद्या दिवसाची निकड निर्माण झाली. अर्थात रोम संस्कृतीमध्ये १४ फेब्रुवारी हा दिवस प्रेमाचा दिवस म्हणून साजरा केला जातच होता. त्याच दिवसाला जगतमान्यता मिळाली आणि सध्या साजरा होणारा 'व्हॅलेंटाईन डे'ला 'सेलिब्रेशन'चे दिवस आले. 'व्हॅलेंटाईन डे' हा जसा प्रेमाचा दिवस आहे, तसा या दिवसाला रक्तलांछित इतिहास आहे. कोणताही दिवस किंवा 'डे' साजरा करताना त्यात आनंद मिळणार असेल तर तो साजरा केलाच पाहिजे. पण तो साजरा करताना तो का साजरा केला जातो? त्याची सुरुवात कशी झाली? याची उत्तरे शोधणे म्हणजे त्याचा इतिहास जाणून घेणे गरजेचे आहे. म्हणून 'व्हॅलेंटाईन डे'च्या पार्श्वभूमीवर या दिवसाचा इतिहास वाचकांना अवगत करून देण्याचा हा प्रयत्न आहे.

## सेंट व्हॅलेंटाईन कोण होते?



आख्यायिका १ : सुमारे इसवी सन तिसऱ्या शतकात, प्राचीन रोममध्ये क्लॉडियस (द्वितीय) नावाचा एक राजा होता. हा क्लॉडियस खूप शूर आणि युध्दकलेत पारंगत होता. अविवाहित तरुण हाच उत्तम सैनिक बनू शकतो, असा त्याचा ठाम विश्वास होता. त्याकाळी सतत होणाऱ्या लढायांमध्ये सैनिक मारले जायचे. पुन्हा सैन्य उभारले जात होते. साहजिकच क्लॉडियस राजाने अविवाहित तरुणांची सैन्यामध्ये भरती करण्यास विशेष प्राधान्य दिले होते. त्यासाठी राज्यातील कोणत्याही तरुणाने लग्न करायचे नाही आणि कोणी लग्न केले तर तो राजद्रोह समजून शिक्षा केली जाईल, असे फर्मान काढले.

## रोमन राजा क्लॉडियस आणि सेंट व्हॅलेंटाईन



त्याच काळात ख्रिश्चन धर्मगुरू सेंट व्हॅलेंटाईन रोममध्येच राहत होते. त्यांना राजाचे फर्मान आवडले नाही. दोन माणसांना (स्त्री-पुरुष) लग्न करण्यास मज्जाव करणारे हे फर्मान त्यांनी धुडकावून लावले. अर्थात राजा आणि व्यवस्थेच्या नकळत त्यांनी ख्रिश्चन धर्मानुसार जोडप्यांचे विवाह करून द्यायला सुरुवात केली. काही दिवसांनी राजाला याची माहिती मिळाली. क्लॉडियसने या धर्मगुरूंना पकडले आणि त्यांना फाशीची शिक्षा दिली. सेंट व्हॅलेंटाईन यांना १४ फेब्रुवारी २९० रोजी फाशी देण्यात आली. पुढे जाऊन या दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन या दिवशी व्हॅलेंटाईन्स डे साजरा करण्याचा निर्णय ख्रिश्चन धर्माने जाहीर केला.

## आख्यायिका २

अन्य एका आख्यायिकेनुसार इसवी सन तिसऱ्या शतकातील रोममध्ये ख्रिश्चन धर्म पाळणाऱ्यांचा क्लॉडियस (द्वितीय) राजाने छळ चालवला होता. (त्या काळात ख्रिश्चन धर्म नवीन होता आणि रोममध्ये त्यावेळी रोमन धर्म पाळला आचरणात होता) क्लॉडियस (द्वितीय)ने ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्यांना कारावासात टाकले. शिक्षा भोगत असलेल्या या लोकांना सेंट व्हॅलेंटाईन छुप्या पद्धतीने सोडवायचे काम करत होते. क्लॉडियसच्या व्यवस्थेला या गोष्टीबद्दल कळाल्यावर त्याने सेंट व्हॅलेंटाईनला बंदी केले आणि त्यांना फाशीची शिक्षा सुनावली.


## सेंट व्हॅलेंटाईन यांचा मृत्यू आणि ती चिठ्ठी



क्लॉडियसने व्हॅलेंटाईनला ख्रिश्चन धर्म सोडून त्याचा प्राचीन रोमन धर्म स्वीकारायला सांगितले. पण, सेंट व्हॅलेंटाईन यांनी ते नाकारले. अटकेत असताना सेंट व्हॅलेंटाईन यांचे एका तरुणीबरोबर प्रेम जमले. ती तरुणी तुरुंगाधिकाऱ्याची मुलगी होती. सेंट व्हॅलेंटाईन यांनी त्या तरुणीची दृष्टी पुन्हा प्राप्त करून दिली होती. त्यामुळे ती सेंट व्हॅलेंटाईन यांच्या प्रेमात पडली. सेंट व्हॅलेंटाईन यांना १४ फेब्रुवारी रोजी फाशी द्यायचे ठरले. १४ फेब्रुवारीला फाशीच्या आधी सेंट व्हॅलेंटाईन यांनी या तरुणीला एक चिठ्ठी लिहिली. त्या चिठ्ठीत सर्वात शेवटी लिहिले होते, 'तुझाच व्हॅलेंटाईन.'

**एका आख्यायिकेनुसार क्लॉडियसने अजून एका व्हॅलेंटाईन नावाच्या माणसाला देखील फाशी दिली होती. मात्र तो कोण होता? याबद्दल फार माहिती उपलब्ध नाही.**

## लुपरकॅलिया



प्राचीन रोममध्ये साधारणपणे फेब्रुवारी महिन्यात एक सण साजरा केला जात असे. त्याचे नाव लुपरकॅलिया. आख्यायिकांनुसार हा सण इसवी सन पूर्व सहाव्या शतकापासून साजरा केला जात होता. एक प्रकारे रोमन लोकांचा हा वसंतोत्सव होता. लुपरकॅलिया हा वसंतोत्सव आधी सध्याच्या इटलीतील मेंढपाळांनी साजरा करण्यास सुरुवात केली. लुपरकस हा मेंढ्यांचा संरक्षक देव मानला जात असे. त्याचे अनुयायी मेंढ्यांच्या कातड्याचे कपडे वापरत. लुपरकसच्या नावे असलेल्या एका जंगलात अनेक गुहा होत्या; त्या गुहांमध्ये हे अनुयायी राहत असत. या सणादरम्यान ते दोन मेंढ्या आणि एक कुत्रा यांचा बळी देत असत. लुपरकस मेंढ्याचा देव होता म्हणून मेंढ्या आणि कुत्रा मेंढ्यांचे संरक्षण करतो म्हणून कुत्रा या दोन प्राण्यांचा बळी देण्याची पध्दती रूढ होती. या बळी दिलेल्या प्राण्यांची कातडी पांघरून हे अनुयायी गावात फिरत आणि कातड्याच्याच चाबकाने लोकांना मारत असत. विशेषतः मूल नसणाऱ्या स्त्रियांचा असा समज होता की या मारामुळे त्यांची प्रजनन क्षमता वाढेल आणि त्यांच्यामध्ये मूल नसण्याच्या लज्जेतून मुक्तता मिळेल. अर्थात हा सण प्रजनन क्षमतेची देवता लुपरकसला समर्पित होता. सण असूनही हा बळी देण्याचा, हिंसक, उन्मादक, नग्न आणि यौनिकदृष्ट्या उत्तेजक असा सण होता.काही आख्यायिकांनुसार तरुण एका लाकडी खोक्यातून एखाद्या तरुणीच्या नावाची चिठ्ठी बाहेर काढत आणि तो तरुण आणि ती तरुणी वर्षभर एकत्र राहत असत. या सणादरम्यान लग्नाशिवाय यौवन संबंधांना उत्तेजन दिले जात असे. यातच काही जण लग्न देखील करायचे. या सणादरम्यान सगळे नग्न असत. कधीकधी अनुयायी नग्न तरुणींच्या अंगावर देखील चाबकाने मारत असत. एकूणच नग्नता आणि यौवन संबंध यांनी भरलेला हा सण होता.

## व्हॅलेंटाईन डे

व्हॅलेंटाईन विकमधील सर्वात शेवटचा आणि महत्त्वाचा दिवस म्हणजे व्हॅलेंटाईन डे. जो १४ फेब्रुवारी रोजी येतो. अनेकांच्या दृष्टीने आणि व्हॅलेंटाईन विकमधील आणि वर्षभरातीलसुध्दा हा सर्वात रोमँटिक दिवस आहे. ज्या दिवशी जोडीदारांकडून एकमेकांना विपुल प्रमाणात प्रेम दिले-घेतले जाते. या दिवशी प्रियकरासाठी अविस्मरणीय भेटवस्तू किंवा रोमँटिक लंच अथवा तुमच्या जोडीदारासोबत एक मनोरंजक संस्मरणीय सहलीचे आयोजन करू केले जाते.



**रोझ डे (Rose Day) :** व्हॅलेंटाईन आठवडाच मुळात सुरू होतो ७ फेब्रुवारी म्हणजेच रोज डे पासून. या दिवशी जोडीदार एकमेकांना प्रेमाचे प्रतीक म्हणून एक गुलाबाचे फुल देतात. हे फूल एकमेकांप्रति असलेल्या प्रेमाचा सुगंध दर्शवते. जणू या फुलाच्या माध्यमातून एकमेकांप्रति असलेल्या उत्कट भावभावनांनाच वाट मोकळी करून दिली जाते.



**प्रपोज डे (Propose Day) :** तुम्हाला जर एखाद्याप्रति असलेले तुमचे प्रेम व्यक्त करायचे असेल तर हा दिवस खास त्यासाठीच असल्याचे मानले जाते. व्हॅलेंटाईन विकमध्ये ८ फेब्रुवारी हा दिवस प्रपोज डे म्हणून ओळखला जातो. या दिवशी तुम्ही तुमच्या आवडत्या व्यक्तीला आयुष्यभरासाठी सोबत राहण्याबाबत विचारू शकता.




**चॉकलेट डे (Chocolate Day) :** व्हॅलेंटाईन वीक मधला तिसरा दिवस म्हणजे ९ फेब्रुवारी. जो चॉकलेट डे म्हणून साजरा करतात. खरेतर जेव्हा तुम्ही तुमच्या प्रियकराला चॉकलेटचा बॉक्स किंवा चॉकलेट प्रेमाने देता, तेव्हा तो काहीसा अधिक प्रभावकारक घटक ठरतो. कारण आजच्या काळात चॉकलेट शेअर केल्याने तुमचे नाते घट्ट होते असे मानले जाते.



**टेडी डे (Teddy Day) :** व्हॅलेंटाईन वीकमधला चौथा दिवस म्हणजे १० फेब्रुवारी. याला टेडी डे म्हणून ओळखले जाते. या दिवशी तुम्ही तुमच्या जोडीदाराला (खास करून मुलीला) टेडी बेअर देऊ शकता. हा टेडी म्हणजे प्रियकर. तो सोबत नसतानाही टेडीच्या असण्यामुळे त्याचाच सहवासात असल्याचा आनंद या टेडीतून मिळतो.



**प्रॉमिस डे (Promise Day) :** प्रॉमिस डे ११ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. या दिवशी जोडीदारासोबत अनेक आणाभाका घेतल्या जातात. एकमेकांना आयुष्यभर सोबत राहण्याचे वचन दिले-घेतले जाते. जोडीदाराच्या आयुष्याशी जोडून घेण्याचा हा एक प्रभावी मार्गही अनेकांसाठी ठरू शकतो.



**आलिंगन दिवस (Hug Day) :** व्हॅलेंटाईन वीकचा सहावा दिवस म्हणजे जो १२ फेब्रुवारी. हा दिवस 'हग डे' म्हणून ओळखला जातो. या दिवशी जोडपी प्रेमाने एकमेकांना मिठी मारतात. प्रियकराला उबदार, घट्ट आणि प्रेमळ मिठी देऊन प्रेम व्यक्त करण्याचा हा एक अतिशय सुंदर मार्ग आहे.



**चुंबन दिवस (Kiss Day) :** व्हॅलेंटाईन वीकमधला सातवा दिवस म्हणजे १३ फेब्रुवारीला येणारा चुंबन दिवस म्हणजेच किस डे. पाठीमागच्या आठवडाभरात निर्माण झालेली जवळीक तुमच्यातील नाते अधिक दृढ करते. चुंबन दिवस म्हणजे आपल्या नातेसंबंधाला अधिक घनिष्ठता प्रदान करणे. यामध्ये तुम्हाला चुंबन प्रतिबद्धता आणि जवळीकता दिसून येते.



**तिसऱ्या शतकात...** सेंट व्हॅलेंटाईन यांना तिसऱ्या शतकात फाशी झाली असली तरी हा सण पाचव्या शतकामध्ये अधिकृतरीत्या साजरा केला गेला आणि त्याला सेंट व्हॅलेंटाईन डे असे नावही देण्यात आले.

**पाचव्या शतकात :** साधारणपणे इसवी सन पाचव्या शतकात चर्चने या प्राचीन सणावर आळा घालण्यासाठी आणि ख्रिश्चन धर्माचे वर्चस्व स्थापन करण्यासाठी या सणावर बंदी घातली. त्या काळापर्यंत स्थानिक रोमन धर्म मोडकळीस येत होता आणि ख्रिश्चन धर्म वाढत होता. ख्रिश्चन पोप गेलॅसियस यांनी या सणावर अ-ख्रिश्चन सांगत बंदी घातली आणि १४ फेब्रुवारी हा दिवस, सेंट व्हॅलेंटाईन यांना समर्पित म्हणून व्हॅलेंटाईन डे असा साजरा करायचा आदेश दिला.

## सेंट व्हॅलेंटाईन्स डे आणि प्रेम

इसवी सन पाचव्या शतकापासून जरी सेंट व्हॅलेंटाईन डे साजरा केला जात असला तरीही साधारणपणे १३ व्या अथवा १४ व्या शतकापर्यंत या सणाची ख्याती प्रेमी युगुलांचा सण अशी झालेली नव्हती. चिठ्ठ्या पाठवल्या जात नव्हत्या आणि आजच्या सारखे रूप तर अजिबात नव्हते. सेंट व्हॅलेंटाईन डे आणि प्रेम यांचे नक्की नाते कधी जोडले गेले हे इतिहासाच्या दृष्टीने सांगणं कठीण आहे. पण, या दिवसाला प्रेमाबरोबर जोडणारा सगळ्यात जुना दुवा इसवी सन १३८१-८२ दरम्यान सापडतो. लेखक-कवी जेफरी चाऊसर याने त्याच्या 'लव्ह बर्ड्स' या कवितेत लिहिले आहे की....

'हा सेंट व्हॅलेंटाईनचा दिवस
जेव्हा पक्षी आपला जोडीदार निवडायला इथे येतात'

ही वाक्ये त्याने इंग्लंडचा राजा रिचर्ड (द्वितीय) आणि त्याची बायको ॲन यांच्या साखरपुड्याच्या पहिल्या वाढदिवसाच्या दिवशी लिहिलेली होती. तेव्हापासून व्हॅलेंटाईन डे आणि प्रेम यांचे नाते अधोरेखित झाले.

सगळ्यात जुनी व्हॅलेंटाईन चिठ्ठी इसवी सन १४१५ मध्ये फ्रांसमधील ओर्लिन्सच्या चार्ल्स नावाच्या सरदाराने आपल्या बायकोला कारागृहातून लिहिली असे म्हणतात.

ही चिठ्ठी अजूनही उपलब्ध आहे. पुढे इंग्लंडचा राजा हेन्री पंचम याने देखील अशीच व्हॅलेंटाईन चिठ्ठी लिहिल्याचे उल्लेख आहेत. शेक्सपियर आणि तत्कालीन नाटककार आणि लेखकांनी देखील व्हॅलेंटाईन डे, व्हॅलेंटाईन यांचे प्रेम आणि त्यांची चिठ्ठी यांचा आपल्या कथा आणि नाटकांमधून वापर करण्यास सुरुवात केली. ज्यांमुळे हा दिवस प्रेमाचे प्रतीक म्हणून लोकप्रिय होत गेला. तसेच प्रियकर किंवा प्रेयसीला ही प्रेमाची चिठ्ठी पाठवायची सुरुवात झाली. युरोपभर आणि अमेरिकेतलोक हाताने लिहिलेली चिठ्ठी पाठवत असत. याला व्यापक स्वरूप इसवी सन १९ व्या शतकात प्राप्त झाले. औद्योगिकरणाच्या दरम्यान व्हॅलेंटाईन चिठ्ठ्या देखील छापल्या जाऊ लागल्या. वेगवेगळ्या प्रकारच्या, आकारांच्या आणि रंगांच्या आकर्षक चिठ्ठ्यांनी हातानी लिहिलेल्या चिठ्ठ्यांची जागा घेतली आणि त्याला आजचे रूप प्राप्त झाले. आज व्हॅलेंटाईन डे हा, छापील पोस्ट कार्ड पाठवण्याच्या बाबतीत ख्रिसमसनंतर जगातील दुसरा मोठा सण आहे.



मांडणी : अभिषेक उघडे